**जनतेत क्षोभ उत्पन्न करण्यापेक्षा तिच्यात विचार उत्पन्न करणे हे कितीतरी महत्त्वाचे आणि कठीण कार्य आहे - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी**

# ‘लोक’मत

नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा!

एकविसाव्या शतकाच्या दुस-या दशकाचा प्रारंभ आता झालेला आहे. आपण सर्वांनीच नववर्षाचे स्वागत जल्लोषात केले आहे. या जल्लोषात अनेकानेक प्रश्नांचा काही काळ विसर पडला तरी दुस-या दिवसापासून ते पुन्हा आपल्यासमोर उभे ठाकणार असतातच. त्यामुळे त्यापासून दूर राहून चालणार नसते. चालू शतकातील पहिल्या दशकाने दहशतवादापासून आर्थिक मंदीपर्यंतचे अनेक प्रश्न आपल्यासमोर आणले. ‘नेमेची होणा-या महागाई’शी आपण जुळवून घेत असलो तरी दशक संपता संपता - २०१० या वर्षाअखेरीस - पेट्रोल आणि भाजीपाला महागल्याने सामान्य नागरिक त्रस्त झाला आहे, ही वस्तुस्थिती आहे. या त्रस्त समाजमनाला एक दिलासा आहे तो भारतात लोकशाही आहे याचा. २६ जानेवारी १९५० रोजी भारत ‘प्रजासत्ताक’ बनला. याच दिवशी येथील नागरिकांनी भारतीय प्रजासत्ताकाची राज्यघटना स्वीकारली. वयाच्या एकसष्टीत प्रवेशत असलेले भारतीय लोकसत्ताक पार तळागाळापर्यंत अर्थपूर्ण ठरण्यास १३ व्या केंद्रीय वित्त आयोगाने केलेली एक महत्त्वपूर्ण शिफारस अतिशय पूरक ठरावी. देशाच्या ग्रामीण तसेच शहरी विभागांतील स्थानिक स्वराज्य संस्थांना त्यांच्या योजनाबाह्य खर्चासाठी अदा करावयाच्या निधीची रक्कम घसघशीतपणे वाढविण्याच्या तरतुदीमुळे स्थानिक स्वराज्य संस्था वित्तीयदृष्ट्या बळकट तर बनतीलच; परंतु, हा निधी कशा प्रकारे खर्च करायचा याबाबतचा निर्णय हा सर्वतोपरी त्यांच्याच अखत्यारीत राहणार असल्याने स्थानिक स्वराज्य संस्थांचे वित्तनिर्णयस्वातंत्र्यही अबाधित राहणार आहे. या स्थानिक स्वराज्य संस्थाच्या माध्यमातून सामान्य नागरिकाचा आवाज बुलंद होऊ शकतो. स्थानिक स्वराज्य संस्था राबवत असलेल्या विकासविषयक उपक्रमांमध्ये आपल्या गरजांचे प्रतिबिंब डोकवावे यासाठी, स्थानिक परिसरातील ‘लोक’मताची दखल विकासयोजना आखताना घेतली जावी यासाठी नागरिकांनीच कृतिशील बनायला हवे. असे झाल्यास ‘अर्थ’पूर्ण विकेंद्रीकरणाचे हे साद-पडसाद आपली लोकशाही अधिक अर्थपूर्ण करतील.



अनेक वर्षांच्या लष्करी सत्तेनंतर लोकशाहीची फळे चाखणा-या इंडोनेशियाचा लोकशाहीचा अनुभवही बोलका आहे. इस्लाम आणि लोकशाही यांच्यात साहचर्य असू शकत नाही, हे विधान या देशातील नागरिकांनी खोडून काढले आहे. तेथील लोकांनी आपल्या मताचा उपयोग करून लोकशाहीसाठी कटिबद्ध असलेल्या युधोयोनो यांच्या हाती देशाची सूत्रे सोपविली आहेत. लोकशाही चळवळीसंदर्भात विज्ञान-तंत्रज्ञानही मोठी भूमिका बजावत आहे. माणसाच्या बुद्धिमत्तेतून आणि कल्पनाशक्तीतून विज्ञान-तंत्रज्ञानाने घेतलेल्या झेपेचे उत्तुंग दर्शन नुकत्याच संपलेल्या दशकाने घडविले आहे. माणसांच्या जीवनशैलीवर मोठा परिणाम करणा-या माहिती-तंत्रज्ञानाच्या क्रांतीमुळे जग जोडले गेले आहे, हे खरेच. ‘सायबर विश्व’ आता लहानथोरांच्या परिचयाचे झाले आहे. लोकशाहीवादी चळवळींनीदेखील या ‘सायबर विश्वा’चा उपयोग करून घेतला आहे. त्यामुळे हे ‘सायबर विश्व’ लोकशाही चळवळींना बळ देणारे ठरते किंवा कसे, याचीही चर्चा आता होऊ लागली आहे. या नवतंत्रज्ञानाचा उपयोग करून धार्मिक चळवळीही आपला विस्तार वाढविण्याचा प्रयत्न करू लागल्या आहेत. लोकशाही नसणा-या साम्यवादी चीनमध्ये असे काहीसे घडते आहे. लोकशाहीविषयक अशा काही बाबींचा ऊहापोह ‘अर्थबोधपत्रिके’च्या या ‘लोकशाही विशेषांका’त केला आहे. ■■

## निवेदन

- ज्या देश, प्रदेश, संस्था अथवा व्यक्तिनामांच्या इंग्रजी स्पेलिंगनुसारी अचुक मराठी उच्चारांसंदर्भात संदिग्धता जाणवते अशी नामे लेखांमध्ये देवनागरीत उद्धृत करण्याऐवजी रोमन लिपीमध्ये इंग्रजीतच दिलेली आहेत.
- लेखांमधील संदर्भासाठी विश्वसनीय, अधिकृत अशा साइट्सच धुंडाळण्याचा कटाक्ष ठेवला जातो. तरीही, इंटरनेटवरून घेतलेल्या तपशीलाच्या यथार्थतेबाबत भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी हमी देऊ शकणार नाही. अशा मजकुराची जबाबदारीही संस्थेवर नाही, याची वाचकांनी कृपया नोंद घ्यावी.

राजकीय

# सायबर विश्व : साधन मुक्तीचे की नियंत्रणाचे ?

विज्ञान-तंत्रज्ञानाच्या या युगात एकीकडे माणसांच्या बुद्धिमत्तेमुळे व कल्पनाशक्तीमुळे नवनवीन तंत्रज्ञानाची निर्मिती होत आहे. दुसरीकडे, आपली कल्पनाशक्ती वापरून माणूस याच नवतंत्रज्ञानाचा उपयोग मोठ्या खुबीने करून घेत आहे. विशेषतः, सरकारच्या दडपशाहीच्या विरोधात विविध देशांतील लोकशाहीवादी चळवळींना नवतंत्रज्ञानयुक्त 'सायबर विश्वा'चा अधिक उपयोग करून घेता आला आहे. उदाहरणार्थ, अलीकडच्या काळात इराणमध्ये झालेल्या हिरव्या चळवळीने 'ट्विटर'चा, म्यानमारमध्ये झालेल्या बौद्ध भिख्खूंच्या भगव्या चळवळीने प्रामुख्याने 'यू ट्यूब'चा तर तत्कालीन सोव्हिएत रशियातील अनेक देशांमध्ये झालेल्या विविध चळवळींनी 'मोबाइल फोन'चा उपयोग केला होता. तंत्रज्ञानाच्या अशा प्रकारच्या वापरावर नियंत्रणे आणण्यात आली तरी त्यातून मार्ग शोधून अनेकांनी त्या तंत्रज्ञानाचा उपयोग केला. त्यामुळे हे तंत्रज्ञान वैशिष्ट्यपूर्ण, लोकशाही चळवळीला साहाय्यकारी ठरणारे व म्हणून दडपशाहीपासूनच्या 'मुक्तीचे साधन' आहे, असे मानले जाऊ लागले.

भौगोलिक अंतराचा अंत घडवून आणत परस्परांशी संवाद साधण्यासाठी अतिशय प्रभावी साधने आता उपलब्ध आहेत. इतक्या वेगाने आणि सर्वदूर पोहचणारे असे तंत्रज्ञान प्रसारमाध्यमांच्या इतिहासात प्रथमच उपलब्ध झाले असून ते सर्वसामान्यांना हाताळताही येत आहे. उदाहरणार्थ, 'ट्विटर'वरील 'ट्विट्स्'ची संख्या २००७च्या पहिल्या तिमाहीत पाच लाख इतकी होती, तर त्यानंतरच्या तिस-या वर्षातच म्हणजे २०१०मधील पहिल्या तिमाहीत 'ट्विट्स्'ची संख्या पोहोचली होती चार अब्जांवर! नागरिकांना या तंत्रज्ञानाचा उपयोग जसजसा होऊ लागला आणि लोकशाहीवादी विचार त्याद्वारे पोहचू लागले तसतशी हुकुमशाही सरकारे अडचणीत आल्याने त्यांचे या माध्यमांवरील नियंत्रण वाढले.



मुळात हे नवतंत्रज्ञान आहे असे की त्याद्वारे नागरिक माहितीची जितकी देवाण-घेवाण करतात तितकीच त्यांची व्यक्तिगत माहिती अनेकानेक मार्गांनी त्या यंत्रणेत/माहितीच्या साठ्यात बंदिस्त होण्याच्या शक्यता वाढतात. नाव, पत्ता, ई-मेल, मोबाइल क्रमांक, नोकरी-व्यवसायाशी संबंधित माहिती, बँकेचे व्यवहार, क्रेडिट कार्ड क्रमांक, अन्य कौटुंबिक माहिती ही झाली अशा व्यक्तिगत माहितीची केवळ वानगीदाखल यादी. त्यामुळे, तंत्रज्ञानाशी संबंधित काही विशिष्ट यंत्रणांचा उपयोग करून सरकारला वा अन्य कुणाला ती माहिती मिळविणे शक्य होते. या माहितीचा उपयोग करून सरकार (वा अन्य कोणी) त्या व्यक्तीला अडचणीत आणू शकते. त्यामुळे, नागरिकांच्या व्यवहारांवर बंधने आणण्यासाठी सरकारच्या हाती ते नियंत्रणाचे एक साधनही ठरते. हुकुमशाही देशांत तर असे विशेषत्त्वाने घडू शकते/घडते, पण लोकशाही शासनव्यवस्थेतदेखील असे घडण्याच्या शक्यता नाकारता येत नाहीत. त्याचप्रमाणे, सरकारच्या गोपनीय बाबींसंदर्भातही असे घडू शकते. अलीकडेच अमेरिकी सरकारचे असे काही दस्तऐवज WikiLeaksने उघडकीस आणल्यानंतर उठलेली वादळी चर्चा आपल्यापर्यंत पोहचली आहेच. या पार्श्वभूमीवर हे नवतंत्रज्ञान '(दडपशाहीपासूनच्या) मुक्तीचे साधन' आहे की '(सरकारच्या दृष्टीने) नियंत्रणाचे,' अशी चर्चा आता होत आहे. त्यामुळे, या विषयातील बारकावे लक्षात घेतले पाहिजेत.

संपर्काची ही सर्व नवतंत्रज्ञानयुक्त साधने बदलांना सतत सामोरी जाणारी आहेत. म्हणजे, नागरिकांच्या गरजा लक्षात घेऊन या तंत्रज्ञानात संबंधितांकडून सतत काही ना काही सुधारणा केल्या जातात. हे सुधारित तंत्रज्ञान वापरून समाजात पुन्हा नवे काही बदल होत जातात. तंत्रज्ञानाच्या प्रगतीचा वेग प्रचंड आहे. साहजिकच सुधारणांचा वेगही वाढतो. मग, हे तंत्रज्ञान वापरणा-या व्यक्तींनाही त्यातील नवे काही सतत जाणून घ्यावे लागते. त्यामुळे ही सर्व यंत्रणा एकदम 'डायनॅमिक' ठरते. सतत उत्क्रांत होणा-या या 'सायबर विश्वा'तील पायाभूत सोयीसुविधा म्हणजे हार्डवेअर, नवनवीन सॉफ्टवेअर, ते वापरण्याच्या पद्धती व नियम आणि तंत्रज्ञान निर्माण करणा-यांची व वापरणा-यांची कल्पकता अशा विविध घटकांनी बनलेली एक ecosystemच जणू तयार होते.

तंत्रज्ञानातील कोणत्याही सुधारणा काही विशिष्ट उद्दिष्टाने करण्यात आल्या तरी त्यांचा उपयोग केवळ त्याच कारणांसाठी होईल असे नाही. उदाहरणार्थ, ग्राहकांच्या सोयीसाठी बँकिंग सेवेचा लाभ इंटरनेटच्या माध्यमातून घेता येईल अशी यंत्रणा विकसित करण्यात आली. पण, त्याच माध्यमातून खातेदारांची सविस्तर माहिती व क्रेडिट कार्ड क्रमांक मिळवून खातेदारांची फसवणूक करण्याच्याही घटना घडल्या. अर्थात, अशा घटना घडल्या तरी ई-बँकिंग या सेवेची व्याप्ती दिवसेंदिवस वाढते आहे आणि अधिकाधिक ग्राहक तिचा लाभ घेत आहेत, हे लक्षात घेतले पाहिजे.

नवतंत्रज्ञानाच्या संदर्भात 'नियंत्रण' आणि 'मुक्तीचे साधन' असे शब्दप्रयोग करतानाही त्या त्या ठिकाणचा स्थानिक व सामाजिक संदर्भ लक्षात घेणे गरजेचे ठरते. कारण, प्रत्येक समाजाला वेगवेगळ्या बाबींसंदर्भात मुक्तता असावी असे वाटू शकते. त्यादृष्टीने ते 'सायबर विश्वा'चा उपयोग करीत असतात. उदाहरणार्थ, कुठे जुलुमी सरकारपासून सुटका करून घेण्यासाठी तर दुसरीकडे धार्मिक जोखड हटविण्यासाठी तर तिसरीकडे, सामाजिक विषमता वा लिंगभेद दूर करण्यासाठी, असा स्थळकाळवेळपरत्वे बदलता संदर्भ असू शकतो. नियंत्रणाचा विचारही वेगवेगळ्या कारणांमुळे केला जाऊ शकतो. त्यामुळे, स्थानिकतेचा संदर्भ असलेल्या अशा अनेकानेक चळवळी व नियंत्रण ठेवण्याच्या यंत्रणा एकाच वेळी 'सायबर विश्वा'त अस्तित्वात असतात.

इंटरनेटच्या माध्यमातून घडणाऱ्या या घडामोडींमधून त्या संबंधित प्रश्नांचे व उत्तरांचे जाळेच जणू 'सायबर विश्वा'त आकाराला येत असते. त्यामुळे जागतिक पातळीवरील सामाजिक गुंतागुंत हा विषय 'सायबर विश्वा'च्या क्षेत्रात फार महत्त्वाचा ठरतो. तसेच, याचा परिणाम स्थानिक राजकीय निर्णयांवरही होण्याची शक्यता असते. उदाहरणार्थ, एखाद्या देशात पर्यावरणाशीसंबंधित चळवळींकडून एखादा मुद्दा उपस्थित करण्यात आला असेल आणि अन्य देशांतील नागरिकांना त्यांच्या देशाच्या संदर्भातही तो उपयुक्त वाटत असेल तर त्या मुद्याबाबत तशा प्रकारची चळवळ आपल्या परिसरात घडवून आणून ते आपल्या देशातील राष्ट्रीय वा स्थानिक पातळीवरील सरकारवर दबाव आणण्याचा प्रयत्न करू शकतात/करतात.



त्यातच 'सायबर विश्व' हे खाजगी क्षेत्राच्या अखत्यारीतही आले असल्याने त्याला व्यापारविषयक आणखीही काही आयाम जोडले जाऊन ते अधिक व्यामिश्र व सतत बदलणारे असे बनत जाते.

'सायबर विश्वा'बाबतच्या चर्चा उदारमतवादी-लोकशाही मूल्यांच्या बाजूने झुकलेल्या असतात, असे एक चित्र साधारणपणे आढळते. आफ्रिका, इराण, म्यानमार या देशांमधील नागरिकांनी या नवतंत्रज्ञानाचा उपयोग करून चळवळीचा प्रसार केला की त्या बातम्या जगभरात पोहचतात आणि तंत्रज्ञानाच्या उपयोगाचे उदाहरण म्हणून अशा घटनांचा उल्लेख केला जातो. पण दर वेळी असे घडतेच असे नाही. उदाहरणार्थ, 'सायबर विश्वा'तील गुन्हेगारीजगतही बरेच विस्तारलेले आहे. 'जंक मेल'/'स्पॅम' एवढ्यापुरतेच ते मर्यादित नाही. संगणकीय कामकाजाला हानीकारक असणाऱ्या malwareची (malicious software) निर्मितीही फार मोठ्या प्रमाणावर होते आहे. दर महिन्याला सुमारे दहा लाख malware शोधण्यात संगणकीय सुरक्षा यंत्रणेतील अधिकारी यशस्वी झाले आहेत. 'क्लिक फ्रॉड' हा असाच एक गुन्हेगारीचा प्रकार आहे. या प्रकारात लक्ष्य केलेल्या संगणकात प्रथम malwareचा प्रवेश होतो. मग, त्या संगणकाला 'सायबर' हल्लेखोरांनी चालविलेल्या pay per click या जाहिरातींकडे redirect केले जाते. अशा एका 'क्लिक'मागे फार पैसे मिळत नसले तरी हजारो संगणक या प्रकारात अडकविले जातात (अशा संगणकांना zombies असे संबोधले जाते) तेव्हा गुन्हेगारांना लक्षावधी डॉलर मिळतात. Botnet या नावाने हा प्रकार ओळखला जातो. 'फेसबुक' (Facebook) वरून नाव घेतलेले 'कुबफेस' (koobface) गुन्हेगारीविश्वात प्रसिद्ध आहे. संगणकातील त्रुटी ओळखून malware तयार करणे आणि त्याच वेळी 'फेसबुक'वरील माहितीचा उपयोग करून दररोज सुमारे हजारो malicious facebook accounts तयार करण्याचे काम 'कुबफेस' करीत आहे. त्यांचा उपयोग करून अशा संगणकांना pay per clickकडे वळविण्यात येत आहे. एखाद्या व्यक्तीचा क्रेडिट कार्ड क्रमांक मिळविणेही 'कुबफेस'ला शक्य आहे. (कल्पकता असली तरी) 'सोशल नेटवर्किंग'च्या माध्यमातून अनिष्ट कामे करण्यात 'कुबफेस'ची आघाडी आहे.

या नवतंत्रज्ञानाची निर्मिती ग्राहकोपयोगी ठरावी असे उद्दिष्ट ठेवण्यात आले असले तरी नागरिकांना राजकीयदृष्ट्या सजग व कृतिशील बनविण्यासाठीही त्याचा उपयोग करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे, राजकीय कट-कारस्थानांसंदर्भात 'सायबर विश्वा'चा उपयोग करण्यात आला आहे. परराष्ट्र मंत्रालये, दूतावास, आंतरराष्ट्रीय संस्था व संघटना, वित्तीय संस्था अशा महत्त्वाच्या ठिकाणी असलेली विविध विषयांसदर्भातील संगणकीकृत तपशील तसेच राजकीय नेत्यांची माहिती मिळविण्याचे प्रयत्न करणा-या अनेक घटना 'इन्फर्मेशन वॉरफेअर मॉनिटर'ने पुढे आणल्या आहेत. अशी गुन्हेगारी कृत्ये करण्यास साहाय्यभूत ठरणारी Gh0st Rat सारखी साधने आता इंटरनेटवरून विनामूल्य 'डाउनलोड' करता येतात. अश्लील साहित्य, दहशतवादी कृत्ये आणि अन्य गुन्हेगारीच्या संदर्भात 'सायबर विश्वा'त फार मोठया घडामोडी होत असतात. या शिवाय, विविध प्रकारचे सहकार्य करणा-या गुन्हेगारीविश्वातील 'सायबर कम्युनिटीज्' 'सायबर विश्वा'त तयार होत जातात.

येथे लक्षात घेण्यासारखा आणखी एक महत्त्वाचा मुद्दा असा की, बहुतांश देशांमधील तरूण पिढी 'सायबर विश्वा'त कृतिशील आहे. या तरुण 'डिजिटल नेटिव्ह्ज्'च्या लेखी आर्थिक समृद्धी महत्त्वाची असल्याने व 'सायबर विश्वा'तील गुन्हेगारी स्वरूपाच्या कामकाजाच्या मोबदल्यात धनलाभ होत असल्याने ते याकडे वळतात. त्यातच देशात आर्थिक विषमता मोठ्या प्रमाणावर असेल आणि देशातील अकार्यक्षम राजकीय व्यवस्थेबाबत या तरुणांच्या मनात राग असेल तर हे प्रकरण अधिकच गंभीर होत जाते. कारण, स्वतःची आर्थिक प्रगती साधतानाच राजकीय व्यवस्थेसमोर अडचणींचा डोंगर उभा करणे हे त्यांच्या दृष्टीने आव्हानाचे काम ठरते. अशा वेळी आपले काम हे 'सायबर' गुन्हेगारीत मोडते किंवा कसे याकडे त्यांचे दुर्लक्ष होण्याची वा असे दुर्लक्ष त्यांच्याकडून जाणूनबुजून केले जाण्याची शक्यता असते. किंबहुना, दोन उद्दिष्टे गाठण्यासाठी हे नवतंत्रज्ञान हे त्यांचे जणू मुक्तीचे साधनच असते. त्यामुळे 'सायबर विश्वा'ला 'मुक्तीचे साधन' असे म्हणताना असे अनेक पैलू विचारात घ्यायला हवेत.



'सायबर विश्वा'वर नियंत्रण ठेवणे शक्य नाही असे अनेकदा म्हटले जाते. पण नियंत्रण ठेवण्यासाठी आता तांत्रिक व अ-तांत्रिक अशी विविध प्रकारची साधने उपलब्ध आहेत. नियंत्रणाच्या मुद्याबाबत विविध देशांतील सरकारांकडून विचार होतो आहे. इंटरनेटच्या सुरुवातीच्या टप्प्यात - १९९०च्या दशकात - 'डॉट-कॉम' तेजीत असताना अनेक देशांमधील सरकारांनी त्याबाबत मुक्त धोरण स्वीकारले होते. पण त्याबाबतचे धोके जसजसे समजून येऊ लागले तसतसा सरकारांनी सावधगिरीचा पवित्रा अंगिकारला. त्यामुळे सायबर सुरक्षा हा विषय सर्वच देशांच्या लेखी महत्त्वाचा ठरू लागला. कॉपीराईट आणि बौद्धिक संपदा यांचा विचार करून सायबर सुरक्षेबाबत काही पावले उचलण्यात आली. यानंतर 'सायबर विश्वा'तील सरकारच्या हस्तक्षेपाला जणू कायदेशीर मान्यताच प्राप्त झाली. कॅनडा, जर्मनी व औद्योगिकदृष्ट्या प्रगत असलेल्या अन्य काही देशांनी अशी कृती केली. याचबरोबर, हुकुमशाही व्यवस्था असणा-या म्यानमारसारख्या देशानेही अशी भूमिका घेतली. पण त्याच वेळी म्यानमारने देशातील इंटरनेटसेवेत अनेक अडचणी निर्माण करून देशातील लोकशाहीवादी चळवळ दडपण्याचा प्रयत्न केला होता.

तथापि, सुरुवातीच्या टप्प्यात सायबर सुरक्षा योजना राबविणे ही सरकारच्या दृष्टीने लढण्याची व म्हणून आक्रमक अशी कृती नव्हती तर ती स्वसंरक्षणार्थ केलेली एक कृती होती. पण अभ्यासकांच्या मते या संदर्भात कोणतेही सरकार आक्रमक भूमिका घेण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सायबर युद्धाची शक्यता लक्षात घेऊन संबंधितांना आक्रमक विचार करून ठेवणे भाग पडते. आता अनेक देशांच्या लष्करात सायबर युद्ध लढण्यास सुसज्ज असा स्वतंत्र विभाग असतो. या शिवाय, 'सायबर विश्वा'त खाजगी क्षेत्राचा प्रवेश झाल्याने त्या बाबतचा सुरक्षेचा मुद्दा खाजगी क्षेत्रालाही महत्त्वाचा वाटतो आहे. सरकारने सायबर सुरक्षेबाबत विशेष काळजी घ्यावी, असा आग्रह त्यांच्याकडूनही होतो आहे. त्यामुळे सायबर सुरक्षाविषयक सेवा देणारी मोठी बाजारपेठ आता उभी राहिली आहे. प्रतिवर्षी सुमारे ४० ते ६० अब्ज अमेरिकी डॉलर एवढी उलाढाल तर एकट्या अमेरिकेत होत आहे. ***(पृष्ठ १८ वर पाहावे)***

राजकीय

# शतक लोकशाहीचेच

चालू शतकाच्या दुस-या दशकात प्रवेश करताना लोकशाहीव्यवस्था हा विषय महत्त्वपूर्ण ठरतो आहे. या संबंधीचे आजचे चित्र असे आहे की, जगातील अनेकानेक देशांनी लोकशाहीचा मार्ग स्वीकारला आहे. जगातील निम्म्यांपेक्षा अधिक देशांमध्ये लोकशाही आहे. तर काही देशांमध्ये लोकशाही स्थापन करण्यासाठी नागरिक आजही लढा देत आहेत. जेथे लोकशाही स्थापन झाली आहे अशा देशांमध्ये लोकशाही व्यवस्था व प्रणाली बळकट करण्यासाठी माहितीच्या अधिकारासारखी साधने नागरिकांना उपलब्ध होत आहेत. याचबरोबर, लोकशाही प्रभावीपणे राबविण्यासाठी कृतिशील असणा-या देशोदेशींच्या विविध संस्था व संघटनांचे कार्यकर्ते, धोरणकर्ते आणि अभ्यासक इत्यादींनी एकत्र येऊन विचार-मंथन करावे यासाठीही अभ्यास-चर्चा आयोजित करण्यात येत आहेत. देशोदेशींची लोकशाही मजबूत होण्यासाठी असे सर्व प्रयत्न उपयुक्त ठरू शकतात. अशा वेळी विविध विषयांवर होणा-या मंथनामुळे लोकशाहीविषयक पुढची पावले उचलली जाण्याच्या दृष्टीने संबंधितांना पाठबळच मिळते. दक्षिण आशियातील एक महत्त्वाचा देश असलेल्या इंडोनेशियातील लोकशाही हा विषय या संदर्भात विशेष अभ्यास-चर्चेचा ठरतो. कारण, इंडोनेशियातील बहुसंख्य नागरिक इस्लामधर्मीय आहेत. इस्लाम आणि लोकशाही यांच्यात परस्परसाहचर्य नाही, असे अनेकदा म्हटले गेल्याने इंडोनेशियाचा लोकशाहीविषयक अनुभव चिंतनीय ठरतो. 'रिपब्लिक ऑफ इंडोनेशिया'चे दुस-यांदा निवडून आलेले विद्यमान अध्यक्ष सुसिलो बांबाग युधोयोनो यांनी लोकशाही संदर्भात केलेले विवेचन म्हणूनच महत्त्वाचे ठरते. चालू शतकाची सहजप्रेरणा (instinct) ही लोकशाहीची असणार आहे, असे त्यांचे प्रतिपादन आहे.



सुसिलो बांबाग युधोयोनो



जागतिकीकरणाचा रेटा प्रचंड आहे. संपर्काच्या विविध माध्यमांमुळे अनेकानेक देशांतील नागरिकांचा परस्परसंवाद वाढला आहे. माहिती, वस्तू व सेवा यांचे आदानप्रदान मोठ्या प्रमाणावर वाढले आहे. या प्रक्रियेत नव्याने अस्तित्वात येत असलेला मध्यमवर्ग महत्त्वाचा ठरण्याची शक्यता आहे. हा मध्यमवर्ग सर्वच देशांमध्ये असणार आहे. इंडोनेशियाही त्याला अपवाद ठरणार नाही. या मध्यमवर्गाची दखल घेणे धोरणकर्त्यांना भाग पडेल असे त्यांना वाटते. त्यामुळे लोकशाहीव्यवस्था राबविण्याला अधिक महत्त्व प्राप्त होईल, असा त्यांचा कयास आहे. १९७०-८०च्या दशकात इंडोनेशियाने चांगली आर्थिक प्रगती केली होती. त्या काळात तेथे हुकुमशाही होती. आर्थिक स्थैर्य, विकास आणि देशाची एकात्मता याला हुकुमशाही सरकारने महत्त्व दिले होते. त्या काळात तेथील नागरिक एका प्रकारे आपल्या सुरक्षित कोषात (comfort zone) मग्न होते. इंडोनेशियातील नागरिकांचे मानस लोकशाहीसाठी तयार नाही, असे तेथील धोरणकर्त्यांना वाटत होते. लोकशाहीमुळे देशात एक प्रकारची अस्थिरता निर्माण होऊ शकते आणि त्यामुळे देशाच्या प्रगतीला खीळ बसू शकते, असा एक मतप्रवाह तेथील राजकारणात होता. त्यामुळे हुकुमशाहीमधील स्थैर्याला तेथे महत्त्व देण्यात आले होते. लोकशाही योग्य ठरेल किंवा नाही यावर त्या काळी तेथे वादचर्चा रंगली होती. इंडोनेशियाने सुधारणांच्या (तेथील भाषेत reformasi) दिशेने पावले टाकली आणि तेथील नागरिकांनी धोरणकर्त्यांच्या त्या समजुतीला धक्का दिला.

इंडोनेशियात १९९९मध्ये प्रथमच सार्वत्रिक निवडणुका झाल्या आणि लोकशाहीला आपण सहजपणे सामोरे जाऊ शकतो हे तेथील नागरिकांनी सिद्ध केले. एवढेच नव्हे तर, लोकशाही हा नागरिकांचा अधिकार आहे आणि त्यासाठी नागरिक सजग राहू शकतात हे त्यांनी दर्शवून दिले आहे. उदाहरणार्थ, इंडोनेशियातील निवडणूक प्रक्रिया गुंतागुंतीची आहे (तेथे प्रमाणशीर प्रतिनिधित्व पद्धत आहे). इंडोनेशियात मतदानाची सक्ती नसली तरी मतदानाचे प्रमाण बरेच चांगले राहिलेले आहे. याचा अर्थ नागरिकांच्या मनांत लोकशाहीची एक स्वाभाविक प्रेरणा रुजलेली होतीच, फक्त तिला व्यक्त होण्याची संधी हवी होती, असे दिसते.

लोकशाहीची फळे चाखली की लोकशाहीव्यवस्थेला नागरिक चिकटून राहण्याची आणि ही व्यवस्था अडचणीत आली तर लोकशाहीच्या बाजूने लढण्यास तयार होण्याची शक्यता असते, असे युधोयोनो यांना वाटते. इंडोनेशियातील सरकारने लोकशाहीसाठी पहिली पावले उचलली तेव्हा तेथे लोकशाही टिकणार नाही, अशा चर्चा इंडोनेशियात आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर झडल्या होत्या. तेव्हा लोकशाहीविरोधकांची बाजू बळकट होती. कारण, इंडोनेशियातील अर्थव्यवस्था तेव्हा अडचणीत आली होती. बहुसांस्कृतिक इंडोनेशियातील वांशिक हिंसाचार वाढला होता. ईस्ट तिमोरचा प्रश्न गाजला होता आणि दहशतवादाचा धोकाही समोर ठाकला होता. त्यातच भर म्हणून की काय घटनात्मक पेचप्रसंगही उद्भवले होते. १९९८ ते २००१ या काळात इंडोनेशियाला चार अध्यक्षांच्या कारकिर्दीतून जावे लागले होते. पण या सर्व प्रश्नांवर मात करून इंडोनेशियाने लोकशाहीव्यवस्था टिकविली. Acch या प्रांताच्या स्वायत्ततेचा प्रश्न सुयोग्य पद्धतीने सोडविला. १९९९, २००४ आणि २००९ या तीन वर्षी तेथे सार्वत्रिक निवडणुका झाल्या. लोकशाही व्यवस्थेत विकेंद्रीकरणाला वेग आला आणि मानवाधिकारांकडे विशेष लक्ष देण्यात येऊ लागले. विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे, इंडोनेशियाची आर्थिक प्रगतीही झाली. लोकशाही आणि आर्थिक प्रगती हातात हात घालून चालणार नाही, असा समज इंडोनेशियात होता. पण तेथे आता लोकशाहीने मुळे धरली आहेत आणि आशियातील चीन व भारत यांच्या मागोमाग इंडोनेशियाही आर्थिक प्रगतीच्या मार्गाकडे जाऊ लागला आहे.

लोकशाही संदर्भात चांगले प्रशासन हा फार महत्त्वाचा मुद्दा आहे पण, सुरुवातीच्या टप्प्यात इंडोनेशियाला ते जमलेले नव्हते, असे युधोयोनो यांना वाटते. गरिबी, भ्रष्टाचार, बेरोजगारी आणि अलगतावाद इत्यादी प्रश्नांवर तोडगा काढण्यासाठी केवळ लोकशाहीव्यवस्था प्रस्थापित करणे व निवडणुका घेणे एवढेच पुरेसे ठरत नाही. लोकांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधींनी प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करणे अपेक्षित असते. अन्यथा ते लोकांच्या विश्वासास पात्र ठरत नाहीत. त्यामुळे लोकांच्या समस्यांची व अपेक्षांची जाण असलेले नेते तयार होणे हे लोकशाहीसाठी गरजेचे आहे.



या शिवाय, राजकारणातील पैशाचा प्रभाव कसा कमी करायचा हादेखील तेथे एक मोठा प्रश्न ठरला आहे, असे युधोयोनो म्हणतात. कारण, राजकारणातील नेते पैशाच्या ताकदीपुढे झुकायला लागले तर नागरिकांचे हित कसे जपले जाईल हा प्रश्न उद्भवतो. अशा वेळी लोकशाहीसमोर मोठेच आव्हान उभे ठाकणे स्वाभाविक ठरते. इंडोनेशियाच्या राजकारणात पूर्वी व्यक्तींना महत्त्व दिले गेले होते. आता लोकशाही प्रभावी ठरण्यासाठी व्यक्तींपेक्षा संस्थात्मक रचना व नियम या बाबीही महत्त्वाच्या ठरतील. लोकांनी निवडून दिलेले प्रतिनिधी सक्षम असतील तर देशाची संसद लोकशाहीच्या तत्त्वांना प्राधान्य देणारे कार्य घडवून आणू शकेल. त्यामुळे लोकनेते तयार होणे हे गरजेचे आहे, असे युधोयोनो स्पष्ट करतात.

इंडोनेशियाच्या लोकशाहीबाबत लक्षात घेण्यासारखा आणखी एक मुद्दा असा की, तेथील लोकशाही देशाच्या भूमीतून उगवलेली आहे, परकीय शक्तींच्या मदतीने रुजलेली नाही. अर्थात, इंडोनेशियाने लोकशाहीकडे जाण्याचा मार्ग स्वीकारला तेव्हा इंडोनेशियात आर्थिक संकट निर्माण झाले होते ही मात्र वस्तुस्थिती होती. पण, राजकीय सुधारणा ही तेथील लोकांचीच प्रेरणा होती. लोकशाहीचा विकास सतत होण्यासाठी सजग, सक्षम आणि कृतिशील नागरिक मोलाची भूमिका बजावू शकतात. विशेषतः, भिन्नवंशीय व भिन्नधर्मीय नागरिक असलेल्या इंडोनेशियासारख्या देशात सजग नागरिकच लोकशाहीच्या तत्त्वांचे पालन योग्य रीतीने व्हावे यासाठी आग्रही राहू शकतात. अशा मार्गाने पुढे जात असताना धर्म प्रभावी न ठरता लोकशाहीद्वारे आधुनिक विचार समाजात रुजू शकतात. इस्लामधर्मीय नागरिक बहुसंख्य असलेल्या इंडोनेशियात लोकशाही रुजल्याचे हे उदाहरण जागतिक घडामोडींच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरते. खुलेपणा, सहिष्णूता, आधुनिकता आणि अन्य संस्कृतींप्रती आदर या बाबी लोकशाहीसाठी आवश्यक ठरतात.

आता चांगले नेते कसे घडावेत आणि भ्रष्टाचार कसा संपवावा हे दोन प्रश्न लोकशाही मान्य केलेल्या या देशासमोर प्रामुख्याने पुढे येत आहेत. लोकशाहीविषयक अशा मंथनातून इंडोनेशियातील लोकशाहीची पाळेमुळे मजबूत होतील, असा युधोयोनो यांचा आशावाद आहे. ■■

राजकीय

# चित्र धार्मिक चीनचे !

विज्ञान-तंत्रज्ञान जसजसे प्रगत होत जाईल आणि मानवसमूह जसजसे आधुनिकतेकडे वाटचाल करत जातील तसतसा धर्माचा पगडा कमी होईल अशी अटकळ काही विचारवंतांनी बांधली होती. केवळ साम्यवादी गोटातूनच असे मत मांडण्यात आले होते असे नाही. तर, उदारमतवादी-लोकशाही गोटातूनही असे विचार व्यक्त झाले होते. प्रत्यक्षात मात्र वेगळे काही घडले आहे. केवळ एका वा दोन देशांत नव्हे तर संपूर्ण जगातच धर्माचे प्राबल्य वाढत असल्याचे मत तज्ज्ञ मांडू लागले आहेत. साम्यवादी चीनच्या पोलादी भिंतींच्या आत असेच काहीसे घडते आहे.

उदारमतवादी-लोकशाही देशांमधील नागरिकांना धार्मिक स्वातंत्र्य असते. पण, चीनमध्ये तसे नाही. आर्थिक सुधारणांचा कार्यक्रम राबविण्यासाठी आणि सामाजिक सलोखा राखण्यासाठी धर्मावर नियंत्रण ठेवणे आवश्यक असल्याचे मत 'पीपल्स रिपब्लिक ऑफ चीन'ने मांडून आपल्या नागरिकांच्या धार्मिक स्वातंत्र्यावर नियंत्रण ठेवले होते/आहे. चिनी सरकारच्या 'स्टेट ॲडमिनिस्ट्रेशन फॉर रिलिजिअस अफेअर्स'द्वारे हे नियंत्रण ठेवण्यात येत असते. Deng Xiooing यांच्या नेतृत्वाखाली (१९७८ते१९९२) साम्यवादी पक्षाच्या मध्यवर्ती समितीने १९८२मध्ये तयार केलेल्या Document 19 नुसार चिनी सरकारचे धार्मिक धोरण निश्चित करण्यात येते. Document 19चे शीर्षक The Basic Viewpoint on the Religious Question During Our Country's Socialist Period असे आहे. धर्माला हद्दपार करण्याचे उद्दिष्ट त्यात मांडण्यात आले आहे. तथापि, 'जुन्या श्रद्धा आणि सवयी लवकर मोडल्या जात नाहीत, त्यामुळे याबाबत पुढे येणा-या प्रश्नांना सामोरे जाताना पक्षाच्या नेत्यांनी संयम व सावधिगिरी बाळगली पाहिजे,' असेही त्यात स्पष्ट करण्यात आले होते. पण, धर्मविषयक बाबींचे नियंत्रण करणा-या यंत्रणांना ओलांडून धर्माचा जनमानसातील प्रभाव वाढत असल्याने Document 19 अयशस्वी ठरल्याचे मत तेथे पुढे आले आहे.



बौद्ध, धर्म, ताओइझम, ख्रिस्ती धर्म (कॅथॉलिक व प्रोटेस्टंट) आणि इस्लाम या पाच धर्मांना चिनी सरकारने मान्यता दिली आहे. तथापि, या धर्मांच्या स्वतंत्र वा स्वायत्त अशा नागरी संस्था/संघटना स्थापन करण्याची परवानगी नाही. धर्मविषयक सर्व घडामोडी 'स्टेट ॲडमिनिस्ट्रेशन फॉर रिलिजिअस अफेअर्स'च्या अखत्यारित येतात; मात्र, सरकारची मान्यता नसलेले अन्य धर्म त्यांच्या कार्यकक्षेत येत नाहीत. सरकारची मान्यता नसतानाही रशियातील ख्रिस्ती ऑर्थोडॉक्स, जुडाइझम, बहाई श्रद्धा इत्यादी धर्मविषयक विचार चीनमध्ये पोहचले आहेत. चीनच्या ग्रामीण भागांत हजारो मंदिरे असून त्यांतील काही तर गेल्या दशकातच बांधण्यात आली आहेत. ही मंदिरे म्हणजे जणू स्थानिक लोकांच्या धर्मविषयक रूढी-परंपरा व श्रद्धा जपणारी केंद्रेच! परंपरा जपण्याला आता नवे तंत्रज्ञानही मदतीस सज्ज आहे. त्यामुळे वेबसाइट्स्, व्हिडिओ यांद्वारे ही सर्व माहिती नागरिकांपर्यंत पोहचत आहे. चीनच्या सरकारने या घडामोडींना 'सरंजामशाहीतील अंधश्रद्धा' असे संबोधले असून त्याचा धर्माशी संबंध नाही, असे म्हटले आहे. पण या घटनांना 'धार्मिक'च म्हटले पाहिजे, असे तज्ज्ञांचे मत आहे. या शिवाय, चीनमध्ये अनेक घरांमध्ये चर्च आहे (त्यांना 'हाऊस चर्च' असेच संबोधले जाते). या 'हाऊस चर्च'वर सरकारला कोणत्याही प्रकारचे नियंत्रण ठेवता येत नाही, त्याच वेळी त्यांच्याकडे दुर्लक्षही करता येत नाही. त्यामुळे संबंधित अधिकारी संभ्रमात सापडले आहेत, असे निरीक्षण अभ्यासक नोंदवतात.

'फालून गोंग' अशी एक धार्मिक चळवळ चीनमध्ये १९९२मध्ये उदयास आली होती. शारीरिक व मानसिक आरोग्याच्या दृष्टीने ध्यानधारणा महत्त्वाची मानणा-या या चळवळीत १९९९मध्ये सुमारे एक कोटी नागरिक सहभागी झाले होते. त्याच वर्षी 'फालून गोंग'वर टीका झाल्यानंतर या नागरिकांनी मोठी निदर्शने केली होती. त्या घटनेनंतर चिनी सरकारने ही चळवळ मोडून काढण्याचा प्रयत्न केला. चिनी सरकारने 'फालून गोंग'ची नोंद evil cult अशी केली आहे. या चळवळीशी संबंधित नागरिक चीनमध्ये तसेच अन्य देशांमध्ये वास्तव्यास आहेत. वृत्तपत्रे, दूरचित्रवाणी व अन्य माध्यमांच्या मदतीने ही चळवळ जगभरातील नागरिकांपर्यंत पोहचत आहे.

चीनमधील शिनझियांग प्रांतातील इस्लामधर्मीय नागरिकांबाबतही काही विशेष घटना घडल्या आहेत. हा प्रांत समृद्ध असून सरकार या प्रांताच्या तसेच नागरिकांच्या विकासाकडे दुर्लक्ष करीत असल्याची त्यांची तक्रार होती. धार्मिक स्वातंत्र्य मिळावे हीदेखील त्यांची मागणी होती. पण चिनी सरकारने त्यांच्या मागण्या मान्य केल्या नाहीत. सरकारने या प्रांतातील आंदोलन दडपले आणि हानवंशियांना तेथे वसविले. त्यामुळे स्थानिक इस्लामधर्मियांचे संख्याबळ घटले. अशा प्रकारच्या धार्मिक घडामोडींसंदर्भात कृती करताना चिनी सरकारने वेळोवेळी ad hoc पावले उचलली. अधिकृतरीत्या मात्र Document 19 चा आराखडा सरकारसमोर होता. त्यामुळे सरकारची कृती तुकड्यातुकड्यांनी जोडल्यासारखी दिसत होती. अलीकडे मात्र धर्मविषयक बाबींसंबंधात नवा काही दृष्टिकोण स्वीकारण्याची गरज आहे का, याचा विचार सरकार करीत आहे. मात्र, चिनी सरकारच्या दृष्टिकोणातून ही सर्व चर्चा संवेदनशील असल्याने ती विशिष्ट वर्तुळात व बंद दाराआडच होते आहे. धर्मविषयक घडामोडींमध्ये नागरिकांचा सहभाग असूनही या विषयाच्या चर्चेत नागरिक कुठेच नाहीत.

चीनमधील या सर्व घडामोडींमध्ये 'सायबर विश्व' हे फार महत्त्वाची भूमिका बजावत आहे. 'सायबर विश्वा'वर चीनने नियंत्रण ठेवले आहे. त्यामुळे धार्मिक विचार पोहचण्यास अडथळे निर्माण होत आहेत. तरी 'सायबर विश्व' पूर्णपणे बंद करणे चिनी सरकारला शक्य नाही. त्यामुळे धर्मविषयक घडामोडी घडतच राहतील आणि काही प्रमाणात नागरिक त्यात सहभागी होतच जातील, असे चित्र चीनमध्ये असण्याची शक्यता अधिक दिसते. अन्य देशांमधील धार्मिक चळवळी चिनी नागरिकांवर व सरकारच्या धोरणांवर प्रभाव पाडतील किंवा कसे हे अद्याप स्पष्ट नाही. या पार्श्वभूमीवर चीनचे सरकार व नागरिक यांच्यात या विषयावर कमी-अधिक प्रमाणात संघर्ष होत राहील, असा तज्ज्ञांचा अंदाज आहे.

आज चीनमध्ये लोकशाही नाही. पण लोकशाही व्यवस्था राबविताना लोकभावनेचा आदर करणे अपेक्षित असते. म्हणून भविष्यात चीनने लोकशाहीकडे वाटचाल करण्याचे ठरविले तर धर्मविषयक लोकभावनेचा आदर तेथील सरकार करेल का, असा प्रश्न मनात उमटतो. ■■



*(पृष्ठ १०वरून)*

तंत्रज्ञानातील बदलांमुळे आता सायबर सुरक्षा ही अधिक प्रगत होत आहे. म्हणजे, उपलब्ध माहितीला केवळ चाळणी लावणे याच्या पलीकडे ती जाते आहे. हे नियंत्रण आता तांत्रिकतेबरोबरच नवीन नियमांकडे अधिक झुकते आहे. अशा अनेकानेक बाबींचा संदर्भ लक्षात घेऊन 'सायबर विश्वा'बाबत आता अधिकच सजग बनण्याची गरज निर्माण झाली आहे. 'सायबर विश्वा'तील गुंतागुंत समजून घेऊन त्या संदर्भात भूमिका घेताना कोणत्याही एकाच दृष्टिकोणातून विचार करता येणार नाही, हे सर्वप्रथम लक्षात घेतले पाहिजे. तसेच, या क्षेत्रात तीव्र स्पर्धा असल्याने येथे सतत काही नवे बदल होत असतात. त्यामुळे अनेकानेक बाबींसंदर्भात समाजावर त्या त्या वेळी होणारे परिणाम वेगळे असू शकतात, याचे भान असणे आवश्यक ठरावे. साम्यवादी वा हुकुमशाही सरकारांना हटविणे व लोकशाही प्रस्थापित करणे यासारख्या राजकीय प्रश्नांच्या संदर्भात नवीन तंत्रज्ञान हे नागरिकांना हमखास साहाय्यकारी ठरेलच असे नाही. उदाहरणार्थ, चीन, इराण, म्यानमार इत्यादी देशांमध्ये या नवीन तंत्रज्ञानावर बरेच नियंत्रण ठेवण्यात येत आहे. विकीपिडियावरील सर्व माहिती नागरिकांना मिळणार नाही अशी व्यवस्था चीनमधील सरकारने केली होती. तर, इराणमधील सरकारने इंटरनेटच्या वेगावर मर्यादा आणून आपल्या विरोधातील गटांना अडचणीत आणले होते/आहे. म्यानमारमध्येही असेच घडले होते.

'सायबर विश्वा'वर नियंत्रण आणता येत असल्याने ते मुक्त नाही, हे आता सर्वांना कळून चुकले आहे. त्यामुळे 'सायबर विश्वा'शी संबंधित गैरप्रकार रोखण्यासाठी 'सायबर विश्वा'चे नियमन कसे करायचे, हा प्रश्न आता विविध देशांतील सरकारांसाठी तसेच 'सायबर विश्वा'शी संबंधित अन्य सर्वांसाठी महत्त्वाचा ठरतो आहे. याचबरोबर 'सायबर विश्वा'त असणा-या जागतिक नागरिकांच्या मानवाधिकारांचे रक्षण करायचे असेल तर अशी पावले उचलणे अत्यावश्यक ठरेल, असेही मत अभ्यासकांकडून मांडले जात आहे. अर्थात, असे कोणतेही बदल हे चटकन घडणार नाहीत, पण त्या दिशेने वाटचाल चालू ठेवली तर भविष्यातील 'सायबर विश्व' सर्वांसाठीच अधिक उपयुक्त ठरू शकेल. ■■

राजकीय

# साद - पडसाद ‘अर्थ’पूर्ण विकेंद्रीकरणाचे

‘लोकांचे, लोकांनी, लोकांसाठी चालविलेले राज्य म्हणजे लोकशाही’, ही लोकशाही राज्यप्रणालीची व्याख्या पाठ करीतच आपण सगळ्यांनी नागरिकशास्त्राची परीक्षा दिलेली असते. भारतासारख्या प्रातिनिधिक लोकशाहीव्यवस्थेत ‘लोकांचे राज्य’ या शब्दसंहतीचा व्यवहारातील अर्थ ‘लोकांनी मुक्त व प्रौढ मतदानपद्धतीद्वारे निवडून दिलेल्या प्रतिनिधींनी मतदारांना जबाबदार राहत राजपट सांभाळणे’ असा असतो. या व्यवस्थेत, निर्णयप्रक्रियेतील जनतेचा सहभाग हा त्यांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधीच्या माध्यमातून घडून येत असतो. हा सहभाग अधिकाधिक अर्थपूर्ण आणि सर्वसामान्यांच्या गरजांशी सुसंवादी असेल अशा प्रकारचा ठरावा यांसाठी अधिकारांचे, निर्णयप्रक्रियेचे अधिकाधिक आणि उत्तरोत्तर विकेंद्रीकरण घडून येणे ही निकोप लोकशाहीव्यवस्थेच्या नांदणुकीसाठी अनिवार्य बाब मानली जाते.

भारतीय राज्यघटनेमध्ये करण्यात आलेली ७३वी तसेच ७४वी घटनादुरुस्ती हा लोकशाही अधिकारांच्या विकेंद्रीकरणाच्या प्रक्रियेतील एक महत्त्वाचा मैलाचा दगड मानला जातो. देशातील सर्व राज्यांत जिल्हा स्तरावर जिल्हा परिषदा, तालुका पातळीवर पंचायत समित्या तर गावपातळीवर ग्रामपंचायती अशा प्रकारची त्रिस्तरीय स्थानिक स्वराज्य संस्थांची व्यवस्था ग्रामीण भागात दृढमूल होण्यात ७३व्या घटनादुरुस्तीने; तर, महानगरपालिका, नगरपालिका आणि नगरपंचायती अशा प्रकारची व्यवस्था नागरी विभागांत निर्माण करण्यात ७४व्या घटनादुरुस्तीने पायाभूत भूमिका बजावली. तसेच, केंद्रीय वित्त आयोगाच्या धर्तीवर राज्यांतही दर पाच वर्षांनी राज्य वित्त आयोग नेमण्याची महत्त्वाची तरतूद या घटनादुरुस्तीद्वारे करण्यात आली. राज्याच्या तिजोरीत जमणा-या एकूण पैशापैकी विभागणीयोग्य निधीचे (डिव्हिजिबल पूल) वाटप राज्य सरकार तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांदरम्यान करण्याबाबतचे सूत्र ठरविणे, हे राज्य वित्त आयोगाचे मुख्य काम.



केंद्र सरकारकडे जमा होणा-या एकंदर वित्तीय साधनसामग्रीपैकी विभागणीयोग्य निधीचे वाटप केंद्र सरकार तसेच देशातील सर्व राज्य सरकारांच्यादरम्यान करण्याबाबतची मार्गदर्शक तत्त्वे तसेच वाटपासंदर्भातील सूत्रे निश्चित करणे, हा केंद्रीय वित्त आयोगाच्या कामकाजाचा गाभा. विभागणीयोग्य एकूण निधीतील राज्य सरकारांचा वाटा ठरवण्याबरोबरच, सगळ्या राज्यांच्या वाट्याला येणा-या एकंदर निधीपैकी किती हिस्सा प्रत्येक राज्याला द्यावयाचा, यांबाबतची मार्गदर्शक तत्त्वेदेखील केंद्रीय वित्त आयोग निर्धारित करतो. ७३व्या तसेच ७४व्या घटनादुरुस्ती विधेयकास संसदेच्या उभय सभागृहांची मंजुरी १९९३ सालच्या एप्रिल महिन्यात मिळाल्यानंतर पुढे, केंद्रीय वित्त आयोगाच्या कार्यकक्षेतही एक अतिशय महत्त्वाचे कलम अंतर्भूत करण्यात आले. विभागणीयोग्य एकंदर वित्तीय साधनसामग्रीमध्ये राज्यांचा वाटा किती असावा हे सांगण्याबरोबरच, या विभागणीयोग्य एकंदर निधीपैकी किती हिस्सा देशभरातील ग्रामीण तसेच शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांकडे हस्तांतरित करण्यात यावा यांबाबतचे मार्गदर्शक सूत्रही निश्चित करण्याची जबाबदारी केंद्रीय वित्त आयोगाकडे सोपविण्यात आली. म्हणजे आता, विभागणीयोग्य निधीचे वाटप केंद्र सरकार, राज्य सरकारे आणि स्थानिक स्वराज्य संस्था अशा तीनही स्तरांवर करण्याबाबतची सूत्रे आणि मार्गदर्शक तत्त्वे निर्धारित करण्याचे काम केंद्रीय वित्त आयोगाच्या अखत्यारीत येते.

सत्ता तसेच कोणत्याही प्रकारच्या निर्णयप्रक्रियेच्या विकेंद्रीकरणाला वित्तीय साधनसामग्रीची उचित आणि पुरेशी जोड असेल तरच अधिकारांच्या विकेंद्रीकरणास व्यवहारात अर्थवत्ता प्राप्त होते. त्यामुळे, ग्रामीण असो वा शहरी, स्थानिक स्वराज्य संस्था वित्तीयदृष्ट्या किती आत्मनिर्भर आहेत, हा इथे कळीचा मुद्दा ठरतो. वरिष्ठ स्तरांवरील सत्ताकेंद्रांवर असलेले या संस्थांचे वित्तीय अवलंबन जितके अधिक तितके निर्णयप्रक्रियेचे विकेंद्रीकरण व्यवहारात निष्प्रभ, असा हा साधा व सरळ हिशेब होय. केवळ इतकेच नाही तर, या ना त्या स्त्रोताद्वारे तिजोरीत जमा झालेला पैसा वापरण्यासंदर्भात या स्थानिक स्वराज्य संस्थांना कितपत स्वातंत्र्य आहे, हेदेखील त्यांच्या स्वायत्ततेच्या दृष्टीने व्यवहारात महत्त्वाचे ठरते.

या संदर्भात, १३ व्या केंद्रीय वित्त आयोगाने आपल्या अहवालात सुचविलेली एक शिफारसवजा तरतूद अतिशय लक्षणीय आहे. २०१० ते २०१५ या पाच वर्षांच्या कालावधीदरम्यान, योजनाबाह्य खर्चांसाठी (नॉन-प्लॅन एक्स्पेन्डिचर) देशभरातील यच्चयावत ग्रामीण तसेच शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांना, विभागणीयोग्य निधीमधून अदा करावयाच्या वित्तीय साधनसामग्रीमध्ये तिपटीहूनही अधिक वाढ सुचविण्याबरोबरच त्या निधीच्या वाटपासंदर्भात स्थानिक स्वराज्य संस्थांनाच सर्वाधिकार बहाल करण्याची शिफारस करून १३ व्या वित्त आयोगाने मोठी बहार उडवून दिली आहे. १३ व्या वित्त आयोगाने उचललेल्या या पाउलाचे पडसाद वित्तीय क्षेत्राइतकेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या राजकीय-प्रशासनिक क्षेत्रांमध्येही जाणवावेत. योजनाबाह्य खर्चांसाठी स्थानिक स्वराज्य संस्थांकडे हस्तांतरित करावयाच्या निधीची रक्कम २० हजार कोटींवरून ६३ हजार कोटींपर्यंत वाढविण्याची शिफारस करण्याबरोबरच, हे वित्तसाहाय्य निखळ खुल्या स्वरूपाचे राखण्याची तरतूद १३ व्या वित्त आयोगाने सुचविल्याने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या वित्तीय आत्मनिर्भरतेच्या कक्षा रुंदावणार आहेत. त्याच वेळी, या निधीच्या विनियोगासंदर्भात संबंधित राज्य सरकारे कोणत्याही प्रकारचा सूचनावजा आदेश वा सल्ला स्थानिक स्वराज्य संस्थांना देऊ शकणार नसल्याने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निर्णयस्वातंत्र्याची पायमल्ली होण्याचा प्रश्नच उपस्थित होत नाही.

पाच वर्षांच्या कालावधीमध्ये हे ६३ हजार कोटी रुपये खुल्या निधीच्या स्वरूपात वाटप करावयाचे म्हणजे दरवर्षी सरासरीने १२ हजार कोटी रुपये देशातील स्थानिक स्वराज्य संस्थांना उपलब्ध होणार आहेत. हा पैसा कोणत्या कामांसाठी खर्च करावयाचा याबाबतचा निर्णय हा सर्वस्वी त्या त्या स्थानिक स्वराज्य संस्थेने घ्यावयाचा आहे. सरकारच्या कोणत्याही प्रकारच्या विशिष्ट योजना अथवा उपक्रमाशी, त्या सरकारी उपक्रमाच्या अंमलबजावणीशी या निधीची सांगड १३ व्या वित्त आयोगाने घातलेली नाही, ही बाब इथे आवर्जून ध्यानात घ्यावयास हवी. परंतु, वित्त आयोगाच्या या शिफारशीमुळे सरकारच्या स्तरावर कशा प्रकारची प्रतिक्रिया निर्माण झाली हे मात्र बघण्यासारखे आहे.



केंद्रीय वित्त आयोगाच्या शिफारशीला अनुलक्षून केंद्रीय पंचायती राज्य खात्याने देशभरातील पंचायती राज्यसंस्थांसाठी एक सल्ला जारी केला. योजनाबाह्य खर्चांखातर अदा करण्यात आलेला निधी हा केवळ पायाभूत सेवासुविधांच्या निर्मितीसाठीच वेच करावा, असा त्या सल्ल्याचा आशय होता. तर, विभाजनयोग्य निधीमधून अदा करण्यात येणा-या या वित्तीय साहाय्याचा विनियोग मनुष्यबळ, पंचायतींचे कार्यालय तसेच अन्य पायाभूत सेवासुविधांची निर्मिती, माहिती-तंत्रज्ञान आणि संपर्क व दळणवळणाच्या सुविधा अशांसारख्या बाबींसाठी करण्याबाबत विचार करावा, अशा आशयाचा सल्लामशवरा राज्य सरकारांना आपण दिल्याचे प्रतिपादन संसदेच्या ग्रामीण विकासाशी संबंधित स्थायी समितीस दिलेल्या प्रतिसादात केंद्रीय पंचायती राज्य मंत्रालयाने केले होते. म्हणजेच, केंद्रीय वित्त आयोगाने शिफारस केलेल्या या खुल्या निधीचा (अन्टाइड फंड) विनियोग पंचायत राज्य संस्था आणि पर्यायाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या गरजांबरहुकूम, त्यांच्या प्राधान्यक्रमानुसार केला जाण्याऐवजी राज्य सरकारतर्फे त्यांना देण्यात आलेल्या सल्लावजा आदेशानुसारच केला जावा, हेच सरकारला अभिप्रेत असल्याचे या सगळ्यावरून स्पष्ट होत नाही का ?

स्थानिक स्वराज्य संस्थांना अदा करण्यात येणा-या वित्तसाहाय्य अथवा अनुदानांच्या वाटप-विनियोगात, अथवा स्थानिक स्वराज्य संस्थांकडे हस्तांतरित करावयाच्या रकमांच्या वितरणात सरकारी विभागांचा हस्तक्षेप असेल तर उपलब्ध करून देण्यात येणा-या निधीचा वापर कार्यक्षम पद्धतीने होण्यात बाधा निर्माण होत असल्याचे दाखले या क्षेत्रातील अभ्यासक देतात. मुळात, स्थानिक स्वराज्य संस्थांना देय असलेली अनुदाने वा अन्य प्रकारचे उपक्रमसंलग्न अर्थसाहाय्य वित्तीय वर्ष संपण्यास अवघे दोन-एक महिनेच काय ते बाकी असताना त्यांच्या सुपूर्त केले जाते. इतक्या उशीरा येऊन पोहोचलेला पैसा मग त्या वित्तीय वर्षात खर्च करणे स्थानिक स्वराज्य संस्थांना जमत नाही. परिणामी, वित्त आयोगाच्या शिफारशींनुसार देय असलेल्या अनुदानांची पुरती उचल आणि वापर स्थानिक स्वराज्य संस्थांकडून त्या वित्तीय वर्षात होणे दुरापास्त होते.

हा पूर्वानुभव ध्यानात घेऊनच १३ व्या वित्त आयोगाने आणखी एक मार्मिक शिफारस केलेली आहे. योजनाबाह्य खर्चांसाठी उपलब्ध असणा-या या अशा खुल्या अर्थसाहाय्याद्वारे प्रवर्तित करावयाच्या कामांसंदर्भातील प्रस्ताव ग्रामपंचायतीने जिल्हा पंचायतीकडे (जिल्हा परिषद) रीतसर सादर केल्यापासून पाच दिवसांच्या मुदतीत संबंधित रक्कम त्या ग्रामपंचायतीस अदा केली जावी, अशा प्रकारचे स्पष्ट निर्देशच वित्त आयोगाने नमूद करून ठेवलेले आहेत. योजनाबाह्य खर्चांसाठी स्थानिक स्वराज्य संस्थांकडे निधीचा प्रवाह दरवर्षी वाहता राहावा या हेतूने १३ व्या वित्त आयोगाने एका सूत्राची शिफारस केलेली आहे. या सूत्रानुसार, आधीच्या वित्तीय वर्षासाठीच्या विभाजनयोग्य निधीच्या एकंदर दोन टक्के रक्कम योजनाबाह्य खर्चांसाठी प्रत्येक वित्तीय वर्षात स्थानिक स्वराज्य संस्थांकडे हस्तांतरित केली जावी, अशी ही शिफारस आहे. या दोन टक्क्यांतही वित्त आयोगाने दीड टक्का आणि अर्धा टक्का अशी वर्गवारी सुचविलेली आहे. (आधीच्या वित्तीय वर्षासाठीच्या) विभाजनयोग्य एकंदर निधीपैकी दीड टक्का रक्कम स्थानिक स्वराज्य संस्थांना पायाभूत अनुदानाच्या (बेसिक ग्रँट) स्वरूपात वितरित करण्यात यावी; तर, २०११-१२ या वित्तीय वर्षासाठी, उरलेल्या अर्धा टक्का रकमेचे वाटप-वितरण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कामगिरीशी संलग्न ठेवावे, असे वित्त आयोगाने सुचविलेले आहे. कामगिरीशी संलग्न अनुदानाच्या हिश्श्याचे हेच प्रमाण २०११-१२ या वित्तीय वर्षानंतरच्या वर्षांसाठी एक टक्का असे राहील.

१३ व्या केंद्रीय वित्त आयोगाने सुचविलेली ही सारीच रचना वैशिष्ट्यपूर्ण आहे. योजनाबाह्य खर्चांसाठी स्थानिक स्वराज्य संस्थांकडे हस्तांतरित करावयाच्या निधीची सांगड (टक्केवारीच्या सूत्राने) विभाजनयोग्य निधीशी घालण्यात आलेली असल्याने एकतर स्थानिक स्वराज्य संस्थांना काही ना काही निधी हा दरवर्षी मिळत राहील आणि दुसरे म्हणजे, विभाजनयोग्य निधीचे आकारमान जसजसे वाढत जाईल तसतसे हस्तांतरित व्हावयाच्या निधीचे आकारमानही आपसूकच वाढते राहील. परिणामी, लोकप्रतिनिधी म्हणून स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये निवडून येणे ही बाबही उत्तरोत्तर आकर्षक बनत जावी हे स्वाभाविकच ठरत नाही का ?



किंबहुना, २०१० सालातील ऑक्टोबर महिन्यात उत्तर प्रदेशात झालेल्या पंचायत राज्य संस्थांच्या निवडणुकांत या बदलत्या चित्राची झलक दिसून आली. तीनही स्तरांवरील पंचायत राज्य संस्थांमधील प्रतिनिधित्वासाठीच्या निवडणुकांमध्ये उमेदवार म्हणून सहभागी होण्याबाबतचा उत्साह २००५ साली झालेल्या निवडणुकांच्या तुलनेत २०१० साली झालेल्या निवडणुकांत अनेक पटींनी वाढलेला दिसला. ग्रामपंचायतींमधील सरपंचपदाच्या ५१ हजार ९२१ जागांसाठी तब्बल ९२ हजार ००२ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उतरले होते. २००५ सालच्या तुलनेत ही संख्या दुपटीहूनही अधिक होती. परंतु, या सगळ्यातील बोचणारा मोठा विरोधाभास म्हणजे, या निवडणुकांमधील मतदानाची सरासरी टक्केवारी मात्र २००५ सालच्या तुलनेत घटलेली दिसली. २००५ साली मतदानाची टक्केवारी होती ८०, तर, २०१० साली तीच टक्केवारी होती ७०. मोठ्या प्रमाणावरील स्थलांतर हे एक कारण यामागे असले तरी पंचायत राज्य संस्थांप्रतीची मतदारांच्या मनातील उदासीनताही यास ब-याच अंशी कारणभूत होती.

**मौज प्रकाशन गृह आणि भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी यांच्या संयुक्त विद्यमाने नवे प्रकाशन**

**उदारमतवादाच्या संस्कृतीचे बीजारोपण करीत १९व्या शतकातील भारतीय प्रबोधनास आकार देणा-या रानडे-तेलंग-चंदावरकर या तीन लोकोत्तर व्यक्तींच्या कार्यकर्तृत्वाचा विश्लेषक आलेख**

**तीन न्यायमूर्ती आणि त्यांचा काळ**

**लेखक - नरेन्द्र चपळगावकर**

**पृष्ठे : ३१५ किंमत : ३००/- रुपये**

**समाजपुरुषांचा वारसा आणि वसा यांचे उचित भान आणून देणारा संशोधनपूर्ण वाचनीय दस्तऐवज**

**वाढता निधी, वाढते आकर्षण**

पंचायत राज्य संस्थांच्या क्षेत्रात कार्यरत असणा-या स्वयंसेवी संस्थांच्या निरीक्षणानुसार, ग्रामपंचायतींसारख्या अगदी तळातील स्थानिक स्वराज्य संस्थेकडे वाहणारा निधीचा वाढता ओघ हे या संस्थांबद्दलच्या वाढत्या आकर्षणाचे मूळ होय. या संदर्भात आवर्जून निर्देश केला जातो तो महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचा. या योजनेच्या अंमलबजावणीमध्ये ग्रामपंचायतींची भूमिका मोठी कळीची ठरते. योजनेचा लाभ घेऊ इच्छिणा-या लाभार्थींची नोंदणी करण्यापासून ते ग्रामपंचायतीच्या हद्दीत राबवावयाच्या कामांची यादी तयार करून हाती घेतल्या गेलेल्या कामांच्या कार्यवाहीवर देखरेख करण्यापर्यंत ग्रामपंचायतींच्या जबाबदारीची कक्षा विस्तारलेली आहे. चालू वित्तीय वर्षात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत उत्तर प्रदेशात चांगले नऊ हजार कोटी रुपये खर्च होणार आहेत. या एवढ्या पैशाच्या व्यवस्थापनात ग्रामपंचायतींचा सहभाग केंद्रवर्ती स्वरूपाचा असल्यामुळे ग्रामपंचायतींबाबतचे आकर्षण वाढणे स्वाभाविक ठरते. कारण, लोकसंख्येच्या दृष्टीने मोठ्या असणा-या ग्रामपंचायतींकडे, प्रसंगी, साधारणपणे तीन कोटी रुपयांपर्यंतची रक्कम या योजनेंतर्गत येऊ घातलेली आहे. ग्रामपंचायत लहान असेल तर रकमेचा हा आकडा सर्वसाधारणपणे १५ ते २० लाख रुपयांच्या आसपास असतो. एवढा निधी ग्रामपंचायतींकडे वळविला जात असल्याने ‘आपल्या हातात भरपूर पैसा येईल’, असा समज मनाशी बाळगून अनेकजण ग्रामपंचायतींच्या निवडणूक आखाड्यात अहमहमिकेने उतरतात.

हा समज वास्तवात कितपत यथार्थ आणि कितपत भ्रामक, ही बाब अलाहिदा. परंतु, ग्रामपंचायतीचा सदस्य वा पदाधिकारी म्हणून येनकेनप्रकारेण निवडून यायचेच, अशा निर्धाराने निवडणुकीच्या रिंगणात उतरलेले इच्छुक उमेदवार मग सर्व प्रकारच्या मार्गांचा यथाविधी अवलंब करतात, या वस्तुस्थितीचा रोकडा प्रत्यय ११ ते २५ ऑक्टोबर २०१० या कालावधीदरम्यान उत्तर प्रदेशात झालेल्या पंचायत राज्य संस्थांच्या निवडणुकीदरम्यान आला. मतदारांवर प्रभाव पाडण्यासाठी दारूपासून ते दंडशक्तीपर्यंत सर्व साधने उमेदवारांनी मुक्तपणे वापरली !



सगळ्यात मोठी गंमत दिसली ती उमेदवारांनी निवडणुकीसाठी उधळण केलेल्या पैशांच्याबाबतीत. वास्तविक पाहता, पंचायत राज्य संस्थांच्या निवडणुकीदरम्यान उमेदवारांनी किती खर्च करावयाचा यांबाबतचे दंडक उत्तर प्रदेश राज्य निवडणूक आयोगाने निश्चित केलेले होते. ग्रामपंचायतीतील सरपंचपदासाठीची निवडणूक लढविणा-यांसाठी ३० हजार रुपये, तालुका पंचायतीच्या सभासदत्वासाठी निवडणूक लढविणा-यांसाठी २५ हजार तर, जिल्हा पंचायतीचा सदस्य बनण्यासाठी निवडणूक लढविणा-यांसाठी ५० हजार रुपये, अशी ही निवडणूक खर्चाची लक्ष्मणरेषा होती. ही मर्यादा सर्वच स्तरांवरील उमेदवारांनी पार धाब्यावर बसविली. प्रत्यक्षात, ग्रामपंचायत स्तरावरील निवडणुकीसाठी प्रत्येक उमेदवाराने सरासरीने, गेला बाजार, एक लाख रुपये खर्च केले असावेत, असा एक अत्यंत नेमस्त अंदाज पंचायत राज्य संस्थाविषयक संशोधनक्षेत्रात कार्यरत असणा-या तेथील एका स्वयंसेवी संस्थेच्या निरीक्षकांनी व्यक्त केलेला आहे. पंचायत राज्य संस्थांच्या निवडणूककाळात, म्हणजेच, ११ ते २५ ऑक्टोबर २०१० या अवघ्या एका पंधरवड्यात, निवडणुका झालेल्या उत्तर प्रदेशातील प्रत्येक जिल्ह्यात किमान १० कोटी रुपयांचा खर्च झाला असल्याची अटकळ या स्वयंसेवी संस्थेने बांधलेली आहे. गेल्या संपूर्ण दशकभरात उत्तर प्रदेशात झालेल्या लोकसभा तसेच विधानसभेच्या निवडणुकांदरम्यान उमेदवारांचा दर मतदारसंघामागे सरासरीने किती निवडणूक खर्च झाला असावा, याची अंदाजित आकडेवारी काढली तरी तो आकडा १० ते ५० लाखांच्या ‘रेंज’मध्येच असल्याचे दिसते.

पंचायतींबाबतचे असे वाढते आकर्षण जनसामान्यांमध्ये रुजत असल्याने या निवडणुकांच्या माध्यमातून आपापले पक्षीय हितसंबंध थेट गावपातळीपासून मजबूत करण्यासाठी राष्ट्रीय स्तरावरील राजकीय पक्षांनीही कंबरा कसल्याचे चित्र उत्तर प्रदेशात दिसले. राजकीय सत्ता तसेच निर्णयप्रक्रियेचे विकेंद्रीकरण अर्थपूर्ण बनावे यासाठी प्रवर्तित केले जाणारे वित्तीय साधनसामग्रीचे विकेंद्रीकरण किती बहुपदरी परिणाम घडवून आणते याचे दर्शन घडविणारी ही सारी वस्तुस्थिती लोकशाही व्यवस्थेच्या एका आगळ्या आयामाचा प्रत्यय आणून देणारीच नाही का ? ■■

# अर्थबोधपत्रिका पुरवणी

## *विकासाचा अनुशेष आणि त्याचे मोजमाप*

सामाजिक तसेच आर्थिक विकासाच्याबाबतीत राज्य सरकारकडून आपली उपेक्षा-वंचना केली जात असल्याची सबळ भावना स्वतंत्र राज्याची मागणी करणा-या संबंधित प्रदेशात वसत असल्यामुळेच, एकभाषक मोठ्या राज्यातून वेगळे होण्याच्या मागणीचा नव्याने उच्चार होत असल्याचा अनुभव आताशा विविध ठिकाणी प्रकर्षाने येतो आहे. सर्वांगीण सामाजिक-आर्थिक विकास घडवून आणणे, ही आजही प्रायः राज्य सरकारचीच जबाबदारी आहे. आता, 'सामाजिक-आर्थिक विकास' या शब्दसंहतीमध्ये नेमक्या कशाकशाचा अंतर्भाव आहे अथवा होतो, यांबाबतचे सुस्पष्ट विवरण संबंधित असंतुष्ट गटांकडून दरवेळीच केले जाते, असे नाही. तसेच, याच कारणापायी वेगळे निघण्याची भाषा अथवा मागणी करणा-या गट-समूहांनिशी 'विकास' अथवा त्याच्या अभावाची व्याख्या बदलतानादेखील दिसते.

---

***'पुन्हा एकवार राज्य पुनर्रचना ?' या बीजविषयावरील एक परिसंवाद भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीमध्ये २७ व २८ ऑगस्ट २०१० अशा दोन दिवशी आयोजित करण्यात आला होता. या परिसंवादादरम्यान झालेल्या चर्चेचा तपशील 'अर्थबोधपत्रिके'च्या वाचकांसाठी सादर करण्याचा प्रयत्न आहे. त्यानुसार, ऑक्टोबर २०१० (संपूर्ण अंक) तसेच डिसेंबर २०१०च्या अंकांत चर्चेचा वृत्तांत पुरवणीच्या रूपाने सादर करण्यात आला होता. त्याच विचारविमर्शाचा हा पुढील भाग.*** ■ ***संपादक***



नेमक्या अशाच प्रकारच्या भावनेतूनच, विभागीय वैधानिक विकास मंडळांची स्थापना करण्याबाबतची मागणी महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर जवळपास अडीच दशके उलटून गेल्यावर राज्याच्या असंतुष्ट विभागांतून जोरदारपणे व्यक्त झाली. विकासाच्या प्रक्रियेत निर्माण झालेला असमतोल दूर करण्याबाबत राज्यपालांना सल्ला देणारी अशी विभागीय वैधानिक विकास महामंडळे निर्माण करण्याची तरतूद भारतीय राज्यघटनेमध्ये अंतर्भूत आहे. त्यानुसार, विकासातील तो असमतोल दूर करण्यासाठी निधीचे वाटप करण्यासाठी राज्यपाल स्वतःच्या अखत्यारीत व्यवस्था करू शकतात. राज्यपालांना तसा अधिकार आहे. विकासाच्या प्रक्रियेत महाराष्ट्रात निर्माण झालेल्या विभागीय असमतोलाबाबतचे वास्तवशोधन करण्यासाठी ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ प्रा. वि. म. दांडेकर यांच्या अध्यक्षतेखाली सरकारने एक समिती स्थापन केली. राज्य सरकारच्या काही वरिष्ठ अधिका-यांसह अनेक अभ्यासक-संशोधकांचा त्या समितीमध्ये अंतर्भाव होता.

'विकास' या संकल्पनेची प्रथम व्याख्या करणे आणि पिछाडीवर असलेले राज्यातील भूभाग त्यानुसार निश्चित करणे, हे दांडेकर समितीसमोरील सुरुवातीचे दोन विषय होते. या दोहोंबाबत समितीने भरपूर विचारविनिमय व ऊहापोह केला. विकासप्रेरक तसेच विकासपूरक (ज्या सामाजिक तसेच आर्थिक सुविधांची तरतूद करणे ही शासनाची जबाबदारी आहे अशा) बाबींचाच असमतोलासंदर्भात अभ्यास करण्यात यावा, या निर्णयाप्रत समिती त्या मंथनाअंती आली. खासगी गुंतवणूक आणि खासगी उद्यमशीलतेवर विकासविषयक ज्या बाबी अवलंबून असतात त्या संदर्भात शासनसंस्थेची भूमिका ही बव्हंशी नियंत्रण - नियमनात्मक स्वरूपाची - म्हणजेच, कोणत्या गोष्टींना कोणत्या भागात, कशी, केव्हा, कोठवर अनुमती देण्यात येईल, या संदर्भातील नियामक तत्त्वे तयार करण्यासारखी - असते. मग उरली बाब सामाजिक-आर्थिक सुविधांच्या पुरवठा-तरतुदीसंदर्भात पिछाडीवर पडलेले विभाग निश्चित करण्याची. सामाजिक-आर्थिक सुविधांच्या राज्यभरातील पुरवठा-उपलब्धीबाबतचे आणि त्या संदर्भातील असमतोलाबाबतचे वास्तव अभ्यासावयाचे तर दोन वा तीन वा चार प्रदेशांच्या एकत्रीकरणात्मक पातळीवरून त्या समस्येकडे बघणे

हे निधी तरतुदीच्या दृष्टीने शासनास उपयुक्त ठरले नसते. कारण, पिछाडीवर असलेल्या अशा प्रदेशांत त्या त्या सामाजिक-आर्थिक सुविधांच्या पुरवठ्यासाठी निधीचे वाटप करण्यात पुन्हा प्रश्न उभा राहिला असता. विविध प्रकारच्या सामाजिक-आर्थिक पायाभूत सेवासुविधांपासून वेगवेगळ्या प्रकारे वंचित राहिलेल्या कोणत्या गावांना वा शहरी विभागांना त्या त्या सुविधेसाठी नेमका किती निधी अदा करावयाचा याचा उलगडा या व्यवस्थेमध्ये शासकीय यंत्रणेस होत नाही. तेव्हा, सुविधांच्या तुटवड्याचे निश्चितीकरण करण्यासाठी 'जिल्हा' हा पायाभूत घटक धरला जावा, या निर्णयाप्रत समिती येऊन पोहोचली. त्यानुसार, त्या त्या सुविधेच्या उपलब्धतेतील तुटीचे मोजमाप जिल्हावार करण्यात यावे आणि ज्या सुविधांच्याबाबतीत राज्यस्तरावरच अतिशय तुटपुंजी, दुर्बळ तरतूद दिसेल त्या सुविधेसंदर्भात तुटीच्या निश्चितीकरणासाठी 'तालुका' अथवा 'गट' हेच अधिक उचित एकक ठरेल, या भूमिकेप्रतही समिती आली. सामाजिक-आर्थिक सुविधांच्या तुटींसंदर्भातील जिल्हास्तरीय आकडेवारीचे एकत्रीकरण करून व्यापक अशा विभागाचे तुटीबाबतचे एकत्रीकरणात्मक चित्र तयार करणे शक्य बनते. परंतु, त्या सुविधांचा पुरवठा आणि उपलब्धीसंदर्भातील त्रुटीचे निश्चितीकरण आणि ती तूट दूर करण्यासाठी हाती घ्यावयाच्या उपाययोजनेसंदर्भात करावयाची प्रत्यक्ष कृती मात्र जिल्हास्तरावरच घडून यावी, ही समितीची भूमिका.

**विकासाच्या असमतोलाचे मोजमाप**

जिल्ह्यांच्या विकासातील असमतोलाचे मोजमाप कसे करावयाचे, या पुढील प्रश्नास मग समितीने हात घातला. विकासासंदर्भात शासन उचलत असलेल्या पावलांमध्ये नानाविध बाबींचा समावेश असतो. खेडोपाडी तसेच शहरोशहरी बारमाही रस्ते बांधणे, प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाच्या सोयी निर्माण करणे, शाळा बांधणे, प्राथमिक आरोग्यासाठी यंत्रणा कार्यरत करणे, स्थानिक तसेच जिल्हास्तरावर आरोग्याच्या सुविधा पुरविणे, भूपृष्ठीय सिंचनासाठी पाटबंधारे बांधणे, शेतीच्या विकासासाठी नाना प्रकारचे उपक्रम राबविणे... अशा असंख्य गोष्टी त्यात येतात. हे सारे ध्यानात घेता, विकासाच्या प्रक्रियेतील विभागीय असमतोलाचे मोजमाप उपरोक्त प्रत्येक सुविधेसाठी



वेगवेगळे करणे आवश्यक आहे, ही बाब प्रकर्षाने स्पष्ट झाली. केवळ इतकेच नाही तर, हा असमतोल दूर करण्यासाठी करावयाची उपाययोजनाही सुविधानिहाय वेगवेगळी असावी, हेही ओघानेच येते. जिल्ह्याच्या विकासातील असमतोलाचे मोजमाप करण्यासाठी या सा-यांचे केवळ एकाच परिमाणात एकत्रीकरण करणे, हे अर्थहीनच ठरले असते. कारण, त्या त्या जिल्ह्याच्या विकासातील असमतोलाचे निराकरण घडवून आणण्यासाठी नेमकी कोणती उपाययोजना कोणत्या सुविधेच्या संदर्भात कशी करावयास हवी, याचे कोणतेही दिग्दर्शन त्या एका परिमाणाद्वारे राज्य सरकारला घडले नसते.

पायाभूत सुविधांचा पुरवठा तर प्रत्येक खेड्यात केला गेलाच पाहिजे. सिंचन प्रकल्पांद्वारे ओलिताखाली आणणे शक्य असलेल्या जिल्ह्यातील सर्व क्षेत्राला (निर्मित सिंचनक्षमता) भूपृष्ठीय सिंचनाची सुविधा पुरविली जाणे आवश्यकच ठरते. वेगवेळ्या सुविधांच्या पुरवठ्यासंदर्भात पूर्ण परिपूर्ती राज्यातील किती खेडेगावे/शहरांच्याबाबतीत झालेली होती, या संदर्भातील आकडेवारी समितीने संकलित केलेली होती. सुविधांच्या पुरवठ्यातील तुटीचा हिशेब मांडणे त्यावरून शक्य बनले होते. सुविधांच्या पुरवठ्यातील ही तूट भरून काढण्याबाबतचे पर्याय मग समितीने विचारार्थ घेतले. त्या त्या सुविधेपासून वंचित असलेल्या खेडेगावांची टक्केवारी राज्यात सर्वाधिक असलेल्या जिल्ह्यापासून सुरुवात करावयाची, हा एक पर्याय. त्या विशिष्ट सुविधेचा लाभ झालेल्या खेड्यांच्या टक्केवारीत असा जिल्हा सर्वांत तळाला असावा, हे मग ओघानेच येते. त्या जिल्ह्यात ती सुविधा वंचित गावांना पुरविण्याचा उपक्रम मग हाती घ्यावयाचा आणि पहिल्या फेरीत, त्या जिल्ह्याला त्या यादीत खालून दुस-या क्रमांकावर असलेल्या जिल्ह्याच्या पंगतीत नेऊन ठेवायचे, ही झाली सुरुवात. हाच उपक्रम पुढील फेरीत पुन्हा राबवायचा. परंतु, या पर्यायाचा अवलंब करण्यात एक धोका होता. तो असा की, एखाद्या सुविधेची उपलब्धता असलेल्या खेड्यांच्या टक्केवारीत तळाला असलेला जिल्हा त्याच यादीत तळापासून दुस-या स्थानावर असलेल्या जिल्ह्याच्या पातळीवर नेऊन पोहोचवेपर्यंत बव्हंश जिल्ह्यांना विकासकामांसाठी निधीचा पुरवठाच केला गेला नसता; अथवा, करता आला नसता. तसे होणे हे केवळ राजकीयच नव्हे तर

सामाजिकदृष्ट्याही चालण्याजोगे नव्हते. मग दुस-या पद्धतीने विचार करणे भाग होते. एखाद्या सुविधेच्या उपलब्धतेसंदर्भात ज्या जिल्ह्यांतील खेडेगावांची टक्केवारी राज्य सरासरीपेक्षा कमी भरेल असे जिल्हे प्रथम हुडकून काढावयाचे आणि मग त्या सुविधेच्या पुरवठ्यासंदर्भातील तुटीचे मोजमाप करावयाचे, या पद्धतीचा अंगीकार करण्याचा निर्णय समितीने घेतला. त्या त्या सुविधेचा पुरवठा व उपलब्धीसंदर्भात राज्य सरासरीपेक्षा खाली असलेली प्रत्येक जिल्ह्यातील गावे राज्य सरासरीपर्यंत वर आणण्यासाठी आवश्यक तो निधी सरकारने पुरवावयाचा हे तत्त्व ठरले. त्या त्या सुविधेच्या उपलब्धता व पुरवठ्यासंदर्भात राज्य सरासरीच्या तुलनेत जिल्ह्याजिल्ह्यांत जेवढी तूट असेल तिच्या प्रमाणात प्रत्येक जिल्ह्यास निधीचे वाटप व्हावे, असे ते सूत्र. त्या त्या सुविधेच्या पुरवठ्याच्याबाबतीत राज्य सरासरीपेक्षा खाली असलेल्या जिल्ह्यांना राज्य सरासरीच्या पातळीवर या प्रकारे आणण्यास किती वर्षे लागतील हे, राज्याची विधानसभा या कामासाठी प्रत्येक वर्षी किती अर्थसंकल्पीय तरतूद करील त्यावर अवलंबून राहते. त्या त्या सुविधेच्या उपलब्धतेपासून वंचित राहिलेल्या खेडेगावांना ती ती सुविधा पुरवून एकदा का त्या सुविधेच्या संदर्भात तो जिल्हा राज्य सरासरीवर जाऊन पोहचला की त्या सुविधेच्यासंदर्भात राज्य सरासरीचे मोजमाप पुन्हा एकवार नव्याने करावयाचे. ही सरासरी, साहजिकच, पूर्वीपेक्षा अधिक असणार. आता, त्या त्या सुविधेच्या उपलब्धतेसंदर्भातील या नवीन राज्य सरासरीच्या खाली पुन्हा काही जिल्हे असणार हे उघडच. अशा जिल्ह्यांना मग त्या नवीन सरासरीपर्यंत वर उचलण्यासाठी उपरोक्त धोरणानुसार पुन्हा निधीचे वाटप करायचे. या वाटपाचा लाभही आधीच्या फेरीतील जिल्ह्यांपेक्षा अधिक जिल्ह्यांना मिळावा, हेही मग ओघानेच येते. या पद्धतीने, त्या त्या सुविधेच्या पुरवठ्यासंदर्भातील राज्य सरासरी प्रत्येक फेरीनिशी उंचावत जाईल. त्या त्या सुविधेच्या पुरवठ्याबाबत सर्व जिल्ह्यांची पूर्ण परिपूर्ती घडून येईपर्यंत हेच सत्र सुरू राहील, हा या सगळ्याचा सारभूत गाभा.

निधी पुरवठ्याच्या प्रत्येक फेरीनिशी प्रत्येक प्रकारच्या सामाजिक-आर्थिक सुविधेच्या पुरवठ्यासंदर्भातील तुटीचे मोजमाप राज्य सरासरीच्या तुलनेत करण्याच्या या पद्धतीचे बलस्थान असे की, राज्यातील प्रत्येक



जिल्ह्याला प्रत्येक वित्तीय वर्षात कोणत्या ना कोणत्या सुविधेच्या पुरवठ्याखातर निधीचे वाटप होतेच होते. निधीपासून कोणताही जिल्हा एखाद्या वर्षात वंचित राहत नाही, काहीना काही वित्तीय तरतूद प्रत्येक जिल्ह्याच्या पदरात पडतेच. प्रत्येकच सुविधेच्या उपलब्धतेसंदर्भात सर्वसाधारणपणे तेच जिल्हे राज्य सरासरीच्या खाली राहावेत अथवा असावेत, असे घडण्याची शक्यता बहुशः नसावीच वा नाहीच. जिल्हा स्तरावर असंतोष निर्माण होण्याच्या शक्यता या धोरणात्मक पर्यायाचा अंगीकार केल्यामुळे मुळातच खुडल्या जातात.

प्रत्येक सुविधेच्या पुरवठ्यासंदर्भात पहिल्या फेरीत विद्यमान असणारी भौतिक तूट दांडेकर समितीने तिच्या अहवालात मांडली. त्यानुसार, पहिल्या फेरीतील उपाययोजनेसाठी किती खर्च येईल, त्याचेही मोजमाप समितीने करून दाखविले. हे मोजमाप समितीने प्रत्येक सामाजिक-आर्थिक सुविधेसाठी स्वतंत्रपणे मांडले होते. प्रत्येक प्रकारची सुविधा निर्माण करण्यासाठी येणा-या सरासरी खर्चाचे जे मोजमाप राज्य सरकारच्या संबंधित विभागाने तयार केले होते, त्याच्या आधारे समितीने तिचे हिशेब मांडले होते. हे सारे हिशेब १९८३ सालातील प्रचलित किमतींनुसार केलेले होते. सुविधांच्या पुरवठ्याच्या पहिल्या फेरीसाठी एकूण किती खर्चाची अथवा निधीची तरतूद करणे भाग आहे, याचे मोजमाप प्रत्येक सुविधेच्या पुरवठ्यासाठीच्या खर्चांचे एकत्रीकरण करून काढले होते. त्याबाबत विचारविनिमय करून त्यानुसार तरतूद करणे हे राज्य सरकार आणि विधिमंडळाला त्यामुळे शक्य बनले असते. इथे एक बाब स्पष्ट आहे. ती अशी की, सुविधांच्या पुरवठ्यातील तूट ही भौतिक तर ती तूट दूर करण्यासाठी आवश्यक असणारी खर्चाची रक्कम ही पैशात्मक रूपातील होती. दरवर्षी किमती बदलत असल्याने खर्चाची ही पैशात्मक रक्कम दरवर्षी बदलत जावी, हे स्वाभाविक ठरते. त्यामुळे, प्रत्येक सुविधेच्यासंदर्भात प्रत्येक वर्षी वास्तवात अनुभवास येणारी तूट जाणून घेऊन तिची नोंद केली जाणे अगत्याचे ठरते.

धोरणविषयक ही दृष्टी, ही भूमिका राज्य सरकार तसेच राज्य विधिमंडळाने स्वीकारली तर विभागीय वैधानिक विकास मंडळे स्थापन करण्याची गरजच उरणार नाही, असे दांडेकर समितीने अंतिमतः आपल्या

अहवालात म्हटले. कारण या संदर्भात पुढे आणखी काही करण्यासारखे कामच, मग त्या विभागीय वैधानिक विकास मंडळांना उरले नसते अथवा उरते ना. परंतु, दांडेकर समितीचा तो अहवाल आणि समितीच्या शिफारसी राज्य सरकारने पूर्णतया स्वीकारल्याच नाहीत. विभागीय वैधानिक विकास मंडळांची निर्मिती करण्यात आली. मोजमाप आणि शिफारशींसंदर्भात या वैधानिक विकास मंडळांनी आपापली वाट चोखाळली. प्रत्येक मंडळाने केलेल्या शिफारशींचा पुनर्मेळ घालून निधी वाटपासंदर्भात राज्य सरकारला सूचना देण्याचे कर्म राज्यपालांच्या वाट्याला आले. तारेवरची कसरतच ही जणू ! राज्यातील विविध विभागांसंदर्भातील वित्तीय अनुशेषाचा निर्देश सरकारकडून नेहमी केला जात असे. अनुशेषाची ही रक्कम कशी काढली जाते, हे समजणे अवघडच आहे. १९८३ सालात प्रचलित असणा-या किमतींच्या आधारे दांडेकर समितीने पहिल्या फेरीसाठीच्या काढलेल्या अनुशेषाशी तिचा संबंध खचितच नसावा ! विकासाच्या प्रक्रियेतील विभागीय असमतोलाची समस्या महाराष्ट्रात (राज्याच्या स्थापनेनंतर पुरेपूर पाच दशकांनंतर) आजही विद्यमान आहे, हीच या सा-याची परिणती.

**अभाव सर्वांगीण आकलनाचा, सम्यक् दृष्टीचा**

स्वतंत्र विदर्भाच्या मागणीने आज पुन्हा एकवार नव्याने उचल घेतली आहे, याचे म्हणूनच आश्चर्य वाटत नाही. वाटावयास नकोही. विदर्भ अथवा राज्यातील अन्य एखादा विभाग उपेक्षा-दुर्लक्षापायी कसा भरडला गेला आहे हे वास्तव विभागीय असमतोल निर्धारण समितीच्या अहवालाच्या धर्तीवर, अद्ययावत आकडेवारीनिशी सादर करण्याचे कष्ट आजवर कोणीही घेतलेले नाहीत. विकासाच्याबाबतीत दुर्लक्ष झाल्याबद्दलची, उपेक्षा झाल्यासंदर्भातील समज अथवा आकलन धूसर आणि काही वेळा भिन्न भिन्न प्रकारे होत असल्यामुळेच कदाचित असे घडत असावे. राज्यामध्ये एका पाठोपाठ एक सत्तेवर आलेल्या राजकीय नेतृत्वाबद्दल विश्वासाचा एक सर्वसाधारण अभावच अनुभवास येताना दिसतो. राज्याच्या एका भागातून झालेल्या एखाद्या मंत्रिमंडळ सदस्याचे अथवा सदस्यांचे राज्याच्या अन्य भागांतील समस्यांबद्दलचे आकलन अल्पस्वल्पच असते. त्या प्रश्नांच्या सोडवणुकीमध्ये लक्ष घालण्याबाबतही त्यांना फारसे स्वारस्य आढळत नाही.



समस्याग्रस्त विभाग आणि त्या विभागातील रहिवाशांबद्दल त्यांना सहानुभूतीही वाटताना दिसत नाही. त्यांच्यापैकी अनेकांचा अन्य विभागांशी सामाजिक संपर्क अथवा काही नातेसंबंधही असल्याचे जाणवत नाही. महाराष्ट्र हे एक अतिशय विशाल राज्य आहे. राज्याच्या वेगवेगळ्या भागांतील समाज विलक्षणच विभागीय, स्थानीय स्वरूपाचे आहेत. त्यांच्यात परस्परसंबंधही तसे विरळच दिसतात. अशा परिस्थितीत मंत्रिमंडळात मंत्रीस्तरावर तसेच राजकीय संघटनेच्या पातळीवरही राज्याच्या विविध भागांतील नागरिक आणि त्यांच्या समस्यांबाबतचे नेमके, यथार्थ आकलन तुटपुंजे असावे, याचे नवल नाही. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीचे अर्धशतक उलटून गेल्यानंतरही ही परिस्थिती आहे. स्वतंत्र राज्याच्या मागणीने पुन्हा एकवार नव्याने उचल घेण्याच्या मुळाशी नेमके हेच सारे असावे.

राज्याच्या वेगवेगळ्या विभागांतील समस्यांच्या योग्य आकलनाचा अभाव, सामाजिक एकजिनसीपणाची वानवा, सहानुभूतीची कमतरता यांसारख्या समस्यांचे निराकरण स्वतंत्र राज्याच्या निर्मितीमुळे ब-याच अंशी घडून यावे. किंबहुना, विदर्भ वेगळा झाल्यानंतर काही काळाने, स्वतंत्र मराठवाड्याचीही मागणी पुढे येणार नाही ना, असाही विचार मनामध्ये तरळून जातो. महाराष्ट्राचे विभाजन दोन नव्हे तर तीन राज्यांमध्ये करण्याची सूचना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी करण्यामागे हेच कारण होते अथवा असावे.

एकापेक्षा अधिक मराठी भाषिक राज्ये असण्याची आणखीही एक उपयुक्त फलनिष्पत्ती संभवते. 'एक भाषा, एक राज्य' या व्यवस्थेमधून निपजणारी प्रादेशिक अस्मिता भारतीय एकात्मतेस घातक ठरण्याबाबतची भीती डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासारख्यांनी व्यक्त केली होती. आज मराठी हीच राज्यव्यवहाराची तसेच न्यायालयीन कामकाजाची एकमात्र अधिकृत भाषा बनलेली नसली तरी तशा प्रकारच्या भाषिक अस्मितेचे प्रकटीकरण आताशा होताना दिसते. एकापेक्षा अधिक मराठी भाषिक राज्ये अस्तित्वात आल्याने या प्रवृत्तींवर अंकुश ठेवला जाण्याच्या शक्यता वाढतात वा संभवतात. संख्येने एकापेक्षा अधिक असणा-या अशा मराठी भाषिक राज्यांमधील लोक आणि लोकनेते एकाच सुरात बोलण्याच्या,

एकच एक घोषणा देण्याच्या आणि एकच समान मुद्दा लावून धरण्याच्या शक्यता विरळ वाटतात. परंतु, एक गोष्ट मात्र तितकीच खरी. महाराष्ट्र उद्या एकसंध राहो वा न राहो, एका महाराष्ट्रातून दोन वा तीन राज्ये निर्माण होवोत अथवा न होवोत, विकासाच्या प्रक्रियेतील विभागीय असमतोलाच्या समस्येचे यथायोग्य आकलन होऊन त्या असमतोलाचे निराकरण घडवून आणण्याच्या दृष्टीने सुविहित कृतिकार्यक्रम हाती घेतला गेला नाही तर विभागीय असमतोलाची समस्या नांदतीच राहील. केवळ एका वेगळ्या राज्याची निर्मिती हा काही त्या समस्येवर उतारा ठरत नाही. विभागीय असमतोलाबाबतचे वास्तव अभ्यासण्यासाठी नियुक्त केलेल्या दांडेकर समितीच्या अहवालात सुचविण्यात आलेल्या धोरणदृष्टीचा अवलंब करून विकासप्रक्रियेतील विभागीय असमतोलाच्या समस्येबाबत जरी उपाययोजना केली गेली तरी उद्या नवीनच काही समस्या उद्भवण्याची शक्यता नाकारता येणार नाही. विकासविषयक जबाबदाऱ्या आणि विकासोपक्रमांसाठी आवश्यक ठरणाऱ्या सर्व प्रकारच्या साधनसामग्रीचे थेट जिल्हा पातळीवर विकेंद्रीकरण घडवून आणणे, हाच त्या साऱ्या समस्या परिणामकारपणे हाताळण्याचा सर्वोत्तम मार्ग ठरेल.

महाराष्ट्रात १९६१ साली अस्तित्वात आलेल्या जिल्हा परिषद कायद्यान्वये नेमक्या याच पर्यायाचा अवलंब केला गेला होता. महाराष्ट्रात राबविल्या गेलेल्या त्या प्रयोगाची पहिल्या दहा वर्षांतील फलनिष्पत्ती अतिशय उत्साहवर्धक अशा प्रकारची होती. परंतु, त्या प्रयोगाचे नेमके तेच यश त्याच्या मुळावर आले. विकेंद्रीकरणाची प्रक्रिया जिल्हास्तरापर्यंत उत्तमरीत्या व्यवहार्य बनल्याने, 'आपल्या मतदारसंघात आपल्याला कोणीच विचारीत नाही', अशा प्रकारची उपेक्षेची भावना मंत्रिगण तसेच आमदारांमध्ये निर्माण झाली. परिणामी, तत्कालीन सत्ताधारी पक्षाने तो साराच प्रयोग मोडीत काढला. सत्ता विकेंद्रीकरणाच्या त्रिस्तरीय व्यवस्थेत प्रत्येक स्तरावर कार्यरत असणाऱ्या लोकनियुक्त प्रतिनिधींना त्या त्या स्तरावर त्यांच्याकडे सोपविल्या गेलेल्या जबाबदाऱ्यांचे अचूक आकलनच न होण्याने, ही परिस्थिती उद्भवते. स्थानिक स्वराज्य संस्थांचे सक्षमीकरण हा स्थानिक समस्या, त्या समस्यांचे स्वरूप आणि त्या समस्यांच्या निराकरणासाठी शोधावयाचा



उतारा यांबाबतच्या अपुऱ्या आकलनापायी निर्माण होणाऱ्या विकासप्रक्रियेतील विभागीय असमतोलाच्या दुखण्याचा उद्भव मुळातूनच टाळण्याचा हमखास उपाय होय. स्थानिक प्रश्नांची सोडवणूक व हाताळणी त्यांना सर्वोचित वाटणाऱ्या उपाययोजनेद्वारे करणे शक्य होण्याच्या दृष्टीने पर्याप्त अधिकार आणि वित्तीय साधनसामग्रीच्याद्वारे स्थानिक स्वराज्य संस्थांचे सक्षमीकरण घडवून आणणे, हेच असंतुलित विकासाच्या समस्येवरील उत्तर. पूर्वी केलेल्या चुकांवरून योग्य तो बोध घेणे आणि त्याच चुका आपण आजही करत असू तर त्यांबाबत योग्य ती पावले त्वरेने उचलणे हेच आपल्या हिताचे ठरेल. ■■

---

*भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीचे मानद अध्यक्ष डॉ. नीळकंठ रथ यांनी* **"Separation is no solution to the problem of regional imbalance in development"** *या शीर्षकाने मूळ इंग्रजीमध्ये लिहिलेला हा प्रस्तुत लेख 'पुन्हा एकवार राज्य पुनर्रचना ?' या बीजविषयावर भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीमध्ये २७ व २८ ऑगस्ट २०१० अशा दोन दिवशी आयोजित करण्यात आलेल्या परिसंवादामध्ये चर्चा-विचारविनिमयासाठी वितरीत करण्यात आला होता. हाच लेख, त्या पूर्वी, 'स्वतंत्र राज्य ही संतुलित विकासाची हमी नव्हे !' अशा शीर्षकाखाली 'साधना' साप्ताहिकाच्या १४ ऑगस्ट २०१० रोजी प्रकाशित झालेल्या 'विदर्भाला सुखी करा !' या ६३व्या वर्धापन दिन विशेषांकामध्ये प्रकाशित झाला होता. 'अर्थबोधपत्रिके'च्या वाचकांसाठी तो इथे मुद्दाम प्रकाशित केला आहे. विकासाच्या प्रक्रियेत महाराष्ट्रात निर्माण झालेल्या विभागीय असमतोलाच्या वास्तवाचा अभ्यास करण्यासाठी ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ प्रा. वि. म. दांडेकर यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र शासनाने जी सत्यशोधन समिती १९८३ साली नियुक्त केली होती त्या समितीमध्ये, एक सदस्य या नात्याने, डॉ. नीळकंठ रथ यांचा अंतर्भाव होता.* ■■

## प्रमुख संदर्भ

**(A) Magazines** : - (1) Journal of Democracy Volume 21, Number 3, July 2010, pages 5-10 and Number 4 October 2010, pages 43-57, 58-71, National Endowment for Democracy and The Johns Hopkins University Press, (2) "Spoils of local bodies : Panchayat elections in Uttar Pradesh are about money and pelf " and also "Panchayati bonanza : 13th Finance Commission puts money in the hands of local governments", Down To Earth, November 1-15, 2010.

या अंकात दिलेल्या पुरवणीतील मजकूर हा भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेने २७ व २८ ऑगस्ट २०१० अशा दोन दिवशी आयोजित केलेल्या परिसंवादातील चर्चा, त्या परिसंवादासाठी संस्थेने तयार केलेला बीजलेख तसेच परिसंवादासाठी निमंत्रित केलेल्या अभ्यासकांनी पाठविलेले लेख व टिपणांच्या आधारे परिसंवादातील सत्रनिहाय चर्चेसाठी तयार करण्यात आलेले संदर्भटिपण यांवर बेतलेला आहे. ■■


## भेट अंक योजना

'अर्थबोधपत्रिका' या उपक्रमात सहभागी झाल्याबद्दल आपले आभार. यात आपल्यासारख्या अनेकांचा सहभाग वाढावा, यासाठी आम्ही आपल्याकडून एक छोटी मदत मागत आहोत. 'अर्थबोधपत्रिका' आपल्यासारख्याच आणखी काही उत्सुक व्यक्तींपर्यंत पोचण्यासाठी आपणास विनंती अशी की, आपण आपल्या परिचयातील वाचनोत्सुक अशा व्यक्तींची नावे व पत्ते आम्हाला लेखी कळवावीत. म्हणजे आम्ही त्यांना एक 'भेट अंक' पाठवू. अंक आवडल्यास त्यांना 'पत्रिके'चे वाचक बनण्याबरोबरच संस्थेच्या समृद्ध ग्रंथालयाचाही लाभ घेता येईल.

### 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांसाठी वाचनसंधी

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेच्या संदर्भ ग्रंथालयात सामाजिक, आर्थिक, राजकीय व अन्य विषयांवरील सुमारे बारा हजारांवर उत्तमोत्तम ग्रंथ आहेत. केवळ इतकेच नाही तर, इकॉनॉमिस्ट, डाउन टू अर्थ, करंट सायन्स, इकॉनॉमिक ॲन्ड पोलिटिकल वीकली यांसारख्या विख्यात नियतकालिकांचे गेल्या अनेक वर्षांचे अंकही संग्रहात आहेत. 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांना या संदर्भ ग्रंथालयाचा लाभ विनामूल्य घेता येईल. या वाचनसंधीबाबत अधिक तपशीलासाठी व्यवस्थापकांकडे चौकशी करावी.





**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीचे आद्य प्रकाशन**
**आता पुनर्मुद्रित स्वरूपात**

**भारतातील गरिबीच्या समस्येचे स्वरूप तिच्या कारणांसह तपशीलवार उलगडून दाखविणारा दस्तऐवज**

# Poverty in India

**लेखक**

वि.म. दांडेकर नीळकंठ रथ

पृष्ठे १४० किंमत : २००/- रुपये

**अर्थकारण-समाजकारणाचे जिज्ञासू, साक्षेपी संशोधक, प्राध्यापक, विद्यार्थी अशा विविध स्तरांतील वाचकांना उपयुक्त असा मौलिक ग्रंथ**

## 'अर्थबोधपत्रिका' वर्गणीदारांसाठी विशेष योजना

**वार्षिक वर्गणी** फक्त १०० / - रुपये

**द्वैवार्षिक वर्गणी** फक्त १८०/ - रुपये व 'अर्थबोधपत्रिके'चा मेंदूसंशोधन विशेषांक भेट

**त्रैवार्षिक वर्गणी** फक्त २६०/ - रुपये व एक पुस्तिका भेट

**पंचवार्षिक वर्गणी** फक्त ४०० /- रुपये व दोन पुस्तिका भेट

**पुस्तिका -** (१) भारतातील लोकसंख्यावाढीचा प्रश्न : लेखिका - कुमुदिनी दांडेकर (किंमत ३०/-रुपये) (२) सक्तीचे प्राथमिक शिक्षण : (इंग्रजी व मराठी) लेखक - जयकुमार अनगोळ (दोन्हीची किंमत ३०/-रुपये प्रत्येकी) (४) शोध घेते ते शिक्षण : लेखक - प्रा. रमेश पानसे (किंमत -५०/-रुपये) (५) मेंदूसंशोधन विशेषांक ( किंमत ४०/-रुपये)